स्टॅच्यू
मराठी भयकथा

स्टॅच्यू...

मराठी रहस्यमय भयकथा

लेखक :-योगेश वसंत बोरसे

भुतात्मा
Publications

स्टॅच्यू...

लेखक-: योगेश वसंत बोरसे

संपादक-: रोहित योगेश बोरसे

आवृत्ती -: मार्च २०२५

ISBN - 978-81-980407-8-7

Published By - : Bhutatma Publication

Publisher -: Yogesh Vasant Borse

Editor -: Rohit Yogesh Borse

© सर्व हक्क सुरक्षित :- लेखक-: योगेश वसंत बोरसे

स्टॅच्यू...

[१]
[२]
[३]
[४]
[५]
[६]
[७]
[८]

[९]
[१०]
[११]
[१२]
[१३]
[१४]
[१५]
[१९]
[२०]
[२१]
[२२]

-:प्रस्तावना:-

मित्रांनो ,नमस्कार - मी योगेश वसंत बोरसे तुम्हा सर्वांचं **भुतात्मा पब्लिकेशन** {BGSM PRODUCTION - BORSE GROUP SUCCESS MISSION } मध्ये स्वागत करतो .

मित्रांनो आमच्या लहानपणी म्हणजे साधारण ८० ते ९० च्या दशकात मुलांचा बराचसा वेळ घराबाहेर खेळण्यात ,हुंदडण्यात जायचा . लपाछपी ,लंगडी ,लिंगोरच्या ,आबाधुबी ,स्टॅच्यू ,खोखो ,बॅट बॉल ,आंधळी कोशिंबीर ,असे अनेक खेळ खेळले जायचे .

तेव्हा घरं मोठी असायची ,वाडे असायचे ,चाळी असायच्या , चाळकरी असतील किंवा वाड्यातील लोकं असतील ,१० ते १५ कुटुंब असली तरी गुण्या गोविंदाने नांदायची . एकत्र राहायची . त्यामुळे मुलं ही सोबत असायची ,अगदी दिवसभर ,तर कधी कधी रात्रीपर्यंत .....

तर मित्रांनो अशीच ही एक कथा - एका खेळा पासून सुरु होणारी तरीही भयकथेचं स्वरूप आलेली , अत्यंत रोमहर्षक ,भयकथा !

तुम्हाला त्या काळात घेऊन जाणारी ! आणि गुंतवून ठेवणारी -

मित्रांनो ही भयकथा काल्पनिक असली तरी परिस्थितीचं साधर्म्य बाळगणारी आहे . यातील पात्र काल्पनिक असून ही आपल्या अवती भवती वावरणारी आहेत . इतकी की वाचतांना ही वाटावं की आपल्या अवती भवती कुणी आहेच !

तेव्हा -स्वतःची काळजी घ्या . ही भयकथा कमजोर मनाच्या वाचकांसाठी नाही याची

कृपया नोंद घ्यावी ! काही प्रसंग अंगावर येणारे आहेत !

तेव्हा स्वतःचीही काळजी घ्या आणि या भयकथेचा थरार अनुभवा - अगदी डोळ्यासमोर उभा राहणारा प्रत्येक प्रसंग .....

तुम्हाला नक्की आवडेल अशी खात्री आहे .

तुमचा –

लेखक : - श्री . योगेश वसंत बोरसे

लेखक :-योगेश वसंत बोरसे

[१]

उन्हाळ्याचे दिवस होते . मुले अंगणात खेळत होती . सुट्ट्या असल्याने पूर्ण दिवस खेळण्यात जात होता .

खेळता खेळता संध्याकाळ झाली . आजूबाजूला झाडं होती आणि मध्ये मोकळा परिसर ! कुणी आठ वर्षाचं ,कुणी दहा वर्षाचं , कुणी बारा वर्षाचा , मुलं ही आणि मुलीही !

खेळून खेळून कंटाळलेली . तशीच एका जागी बसली . काय खेळावं विचाराने ! कुणी हो म्हणायचे ,कुणी नाही म्हणायचे ! शेवटी एकीने सुचवलं ,

"'ए ,आपण स्टॅच्यू स्टॅचू खेळायचं का ? "

का कुणास ठाऊक ? पण सर्वांनी होकार दिला .. तशी एका मुलाने कल्पना मांडली ,

"आपण स्टॅच्यू आणि लपंडाव एकत्र खेळलो तर ? "

"कसं रे ? "

" काही जण स्टॅच्यू होतील ,,काही जण लपतील ! ज्याच्यावर राज्य असेल तो लपलेल्याना शोधेल , आणि स्टॅच्यू ला ही हलायला भाग पाडेल ! पण तेवढ्यात जरुर कुणी मागून येऊन शिवला तरं पुन्हा त्याच्यावर राज्य ,नाहीतर जो पहिला आऊट होईल त्याच्यावर राज्य !.... "

इतर मुलांना कल्पना आवडली, काहींना समजलं ,काहींना नाही !

खेळ सुरु झाला,पहिलं राज्य रेवतीवर आलं.

रेवती !

आठ वर्षाची गोंडस मुलगी !

राज्य घेऊन रेवती दोन तीन डावात कंटाळून गेली.

तिने प्रयत्न केला पण तिच्याकडून कुणीही आऊट होत नव्हतं. तिला एक कल्पना सुचली तिने पुन्हा राज्य घेतलं . आता चार मुली लपल्या आणि चार मुलं स्टॅच्यू झाली .रेवती झाडाला शिवायला गेली , आपल्याकडे कुणाचे लक्ष नाही याची खात्री झाल्यावर ती पण एका झाडा आड गेली आणि लपली .

दोन तीन मिनिटे झाली मुलांना कळेना ? ही अजून कशी येत नाही ?

त्यांच्या हातापायाला कळ यायला लागली . किती वेळ असं उभं राहणार ? स्टॅचू बनून ? चौघांनी डाव सोडला मुलींना आवाज दिला. मुलीही एकेक करत झाडामागून बाहेर आल्या .

रेवती कुणाला ही दिसली नाही !

तसे सवं जण घाबरले आणि रागावले हो !

ही घरी तर नाही पळाली ?

झालं ! सर्व मुलं रेवतीच्या घरी आली !

"रेवती ? ए रेवती ?"

रेवतीची आई बाहेर आली ,

" काय रे काय झालं ?"

" काकू रेवती डाव सोडून पळून आली ! "

" नाही ! रेवती घरी नाही आली ! तुमच्या सोबत खेळायला गेली ना तेव्हापासून नाही आली ! " सीमाताईंच्या काळजात धस्स झालं !

मुलं आता गोंधळली आणि घाबरले ही !

मुलं पुन्हा पळाली , शोधाशोध करू लागली !

बराच वेळ शोधल्यावर रेवती एका झाड आड दिसली !

" रेवती ? अगं इथे काय करतेस ? रेवती ? "

पण ती जागची हलली नाही . तिच्या डोळ्यात प्रचंड भीती होती ! अंग घामाने डबडबलं होतं !

"काकू sssss ,रेवती इथे आहे !"

सीमाताई धावत आल्या .

" रेवती ? ए बाळा ? "

रेवती हलली नाही ! त्यांनी तिला हलवण्यासाठी हात लावला तसा चटका बसला !

"ही ,एवढी कशाने तापली ? "

कुणी तरी रेवतीच्या बाबाना बोलावलं ,एका मुलाने धावत जाऊन चादर आणली ती रेवतीला गुंडाळली गेली . रेवतीच्या बाबानी तिला उचलून घरी नेलं .

डॉक्टरांना बोलावलं , डॉक्टरांनी तपासलं,

"ही खूप घाबरली आहे ! कुठे गेली होती ? "

" बाहेर अंगणात मुलांसोबत खेळत होती ! शेजारी एक वाडा आहे , तिथे बरीच झाडं

आहेत , त्यातील एका झाडाआड उभी होती , तेव्हापासून अशीच आहे ! "

रेवतीचे हातपाय लाकडासारखे ताठ झाले होते .तिला हालचाल करता येत नव्हती. ना बोलता येत होतं . फक्त नजर भिरभिरती होती ! प्रचंड घाबरलेली नजर !

" हिला ऍडमिट करावं लागेल ! " डॉक्टरांनी गंभीरपणे सांगितलं .

रेवती ऍडमिट झाली .अर्थात केली गेली !

➤➤➤➤➤➤

[२]

रात्री सीमाताई रेवतीजवळ थांबल्या. तिच्या जवळच बसून होत्या . रात्र वाढत गेली . अर्धवट झोप ,अर्धवट गुंगी किती वाजले होते कुणास ठाऊक ?

पूर्ण हॉस्पिटल जवळ जवळ झोपी गेलं होतं . थोडा फार मध्ये मध्ये कुणाचा बोलण्याचा आवाज येत होता . रेवतीला सेपरेट रूम मध्ये ऍडमिट केलं होतं .ताप उतरला होता . इंजेकशन मुळे शांत झोपली होती . किती वेळ गेला कुणास ठाऊक ?

" आईssss "

सीमाताई दचकल्या , समोर आवाजाच्या दिशेने बघितलं . समोर रेवती उभी होती . त्यांना समजेना भास की सत्य ! कारण रेवती कॉटवर शांत झोपली होती . त्यांनी पुन्हा आवाजाच्या दिशेने बघितलं ,

" आई , त्या तिथे ना एक मुलगी होती . तिने मला खेळायला बोलावलं आणि स्टॅच्यू केलं. तिच्या हातात बाहुली होती .लाकडाची ! आणि माझ्या समोरच दिसेनाशी झाली .

पुन्हा त्या वाड्यातील दाराजवळ उभी दिसली आणि गायब झाली . नंतर वरील एका खोलीच्या खिडकीतून माझ्याकडे बघत राहिली रागाने ! आई तिला सांग ना डाव सोडायला ! ओव्हर म्हणायला , माझ्या हातापायांना कळ लागतेय गं ! भीती वाटतेय ! आई तिला सांग ना ! "

आणि समोरची रेवती अदृश्य झाली . अर्थात सीमाताईसमोर जी रेवती दिसत होती ती ! सीमाताईंची झोप उडाली .

"रेवती sssss "

त्या जोरात ओरडल्या .त्यांचा आवाज ऐकून नर्स धावत आली.

"सीमाताई काय झालं ?"

सीमाताई ना कळेना काय बोलावं ?

" जरा हिला तपासून बघा ना , केव्हापासून झोपलीय ! आवाज दिला तरी उठत नाही ! "

"अहो ताई ,इंजेकशन चा प्रभाव आहे . झोपेल तर लवकर बरी होईल ,तिला जबर मानसिक धक्का बसलाय ना ! तरीपण तुमच्या समाधानासाठी एकदा तपासून बघते . "

नर्स ने खरोखर तपासून बघितलं. रेवतीचा ताप उतरला होता . पण शरीराचं तापमान झपाट्याने खाली जात होतं अंग गार पडत होतं . नाडी तपासली . ठोके अनियमित पडत होते.

" सीमाताई डॉक्टरांना बोलावते मी ! आलेच “

"अहो पण..... काय झालं ते तर सांगा ? " ! पण नर्स थांबली नाही .तिने बाहेर जाऊनडॉक्टरांना फोन लावला . डॉक्टर काही दिवसापासून वरच राहत होते हॉस्पिटलमध्ये ! इमर्जन्सी आली तर धावपळ नको म्हणून ! तर ते पटकन खाली आले . रेवतीच्या रूम कडे धावले . तिला तपासलं .

" What is this sister ? she is perfectly all right ? "

नर्सचा विश्वास बसेना. तिने पुन्हा तपासलं , रेवती नॉर्मल होती . "sorry sir !"

"it's ok ! अशी चूक पुन्हा करू नका . "

" भाऊजी ,काय झालं ? "

सीमाताईंनी घाबरून विचारलं . डॉक्टर माधव रेवतीच्या वडिलांचे म्हणजे केशवरावांचे मित्र होते. आणि सीमाताई ही त्यांना चांगल्या परिचयाच्या होत्या . त्यांचा चांगला घरोबा होता .

"काही नाही वहिनी ,काळजी करण्याचं कारण नाही .ती आता पहिल्यापेक्षा बरी आहे ! "

"पण भाऊजी ... "

"वहिनी काय झालंय ?"

"नाही ..... झालं काही नाही .. पण ... मगाशी ..."

सीमाताईंनी त्यांचा अनुभव सांगितला .

डॉक्टरांनी शांतपणे ऐकून घेतलं.

" वाहिनी रेवती सांगतेय तसा खरंच तिथे काही वाडा वगैरे आहे ? "

" हो ,आहे ना ! पण असं कधी लक्ष नाही दिलं ! वाडा खूप जुना असावा . तिथे कुणी राहत ही नाही .मग मी जे बघितलं ते सत्य कि भास मलाही समजत नाहीये . "

" हे बघा वहिनी ,जास्त ताण घेऊ नका !तुम्ही दमला आहात ! थोडी झोप घ्या आता ! रेवतीची काळजी करू नका ! ok ? जाऊ मी ?"

सीमाताईंनी मान डोलावून होकार दिला . तसे डॉक्टर निघून गेले .

सीमाताई तिथेच रेवतीजवळ थोडी जागा करून झोपल्या . तिच्या केसांवरून अंगावरून हात फिरवत फिरवत कधी झोप लागली त्यांना ही समजलं नाही .

➤➤➤➤➤➤

[३]

जाग आली तेव्हा सकाळ झाली होती . हॉस्पिटल मधील गजबज वाढली होती . सीमाताईंना चैन पडेना . काही वेळाने रेवतीचे बाबा आले . त्या त्यांच्याशी बोलल्या . त्यांना ही कळेना काय बोलावं ?

रेवती अजून ही झोपून होती .सकाळी ९:३० च्या सुमारास रेवतीला बघायला सीमाताईंच्या शेजारील कुलकर्णी आजी आणि देशपांडे आजी आल्या . सीमाताईंनी

त्यांच्या हो कानावर घातलं .

कुलकर्णी आजींना त्याबद्दल काही माहिती असावी . त्या सीमाताईंजवळ सरकल्या .

" सीमे मी काय म्हणते ?... "

"काय काकू ?"

" अगं तू जे बघितलं ना ,ते एकदमच चुकीचं नाही हो ! कदाचित तुझ्या आणि रेवतीच्या अंतर्मनाची तार जोडली गेली असेल ,म्हणून असं झालं असेल !

त्या वाड्यात खूप वर्षांपूर्वी रेवतीच्या वयाची मुलगी वारली होती ! पार्वती नांव तिचं ! अशीच तापाने फणफणली होती . बरेच दिवस ताप उतरलाच नाही . तिच्या जवळ नेहमी एक बाहुली असायची . लाकडी बाहुली ! ती तिने शेवट पर्यंत सोडली नाही . अगदी शेवट पर्यंत !

ती वारली आणि वाड्याला उतरती कळा लागली . वैभव हळू हळू नष्ट झालं ! घरातील कर्ता पुरुष अपघातात वारला. कुटुंब देशोधडीला लागलं. माझं त्या वाड्यात जाणं येणं होतं .

पार्वतीच्या आईचं नाव यशोदाबाई ! त्यांच्या बोलण्यात बऱ्याचदा पार्वतीचा उल्लेख व्हायचा , की पार्वतीचा अजून ही या वाड्यात वावर आहे म्हणून !

प्रथम त्यांना ते मनाचे खेळ वाटले . पण नंतर रात्री ,अपरात्री , दिवसा ढवळ्या त्यांनी तो अनुभव घेतला . आणि धसका ही ! कारण ते अनैसर्गिक होतं ! एका आत्म्याचा वावर कोणी किती काळ सहन करणार ? त्या खंगत गेल्या , खाणं पिणं सुटलं ! अशा किती दिवस जगणार ? एक दिवस त्या ही वारल्या !

वाडा मग पोरका झाला . त्या वाड्याकडे कुणी फिरकेनासे झालं ! कुणी काही बोलायचं ,कुणी काही ! अशातच एक दिवस कुणी नातेवाईकाने वाड्याला कुलूप घातलं , नंतर हळू हळू चर्चा बंद झाल्या ! पण मग तेही पुन्हा आले नाहीत !

पण माझा तिथे वावर असल्याने कदाचित माझी नाळ त्या वाड्याशी जोडली गेली होती ! पार्वतीशी,यशोदाबाईशी जोडली गेली होती ! रात्री कधी कधी दचकून जाग यायची . आपल्याला कुणी बोलावतंय ,आवाज देतंय ते ही आर्ततेने! कुणाचं तरी रुदन कानावर यायचं ,अगदी जवळून आल्या सारखं ! झोप लागायची नाही ! पण काळाच्या ओघात तीव्रता कमी होत गेली ! नंतर हळू हळू विस्मरणात गेली .

पण तू आता पुन्हा जुन्या आठवणींची तार छेडली . आता मला वाटतंय ,की मला ही त्या गोष्टींचा त्रास होणार ! कदाचित जे काही होतं ते पुन्हा निद्रिस्त अवस्थेतून जागृत झालं असावं ! आणि त्या कचाट्यात तुझी पोर सापडली असावी ! "

एवढं बोलून काकू गप्प झाल्या. त्यांचं बोलणं झाल्यावर देशपांडे आजी म्हणाल्या ,

" सीमे ही म्हणते ते अगदी खरं आहे हो ! जरा मुलीला जपा ,काळजी घ्या ! नाहीतर पोर हातातून जाईल ! " "चल निघू आता आम्ही ? " एवढं बोलून त्या दोघी निघाल्या .

सीमाताईंच्या काळजात धस्स झालं ! आजीचं वाक्य कानात खोलवर रुजलं , आपला परिणाम सोडून गेलं , "जरा मुलीला जपा , नाहीतर पोर हातातून जाईल !

' काय गुन्हा आपल्या मुलीचा ? खेळता खेळता त्या वाड्याजवळ गेली हा ? की नकळत पणे तिकडे ओढली गेली ? आता काय करावं ? '

त्यांनी दुसऱ्या क्षणी एक धाडसी निर्णय घेतला . नर्स ला रेवतीकडे लक्ष ठेवायला सांगितलं , आणि त्या निघाल्या .

'आत्ता दिवस आहे आताच तो वाडा नजरेखालून घालावा . जर काही करता आलं तर लवकर करता येईल ,पण सोबत कुणाला न्यावं ? की कुणाला सांगून जावं ? याना सांगून हे ऐकायचे नाहीत ! आणि आपलंच तिथे काही कमी जास्त झालं तर कुणाला कळणार ? '

सीमाताई प्रथम घरी गेल्या ,रेवतीच्या बाबाना आश्चर्य वाटलं .

"अगं ,मला मघाशी नाही का सांगायचं ? तिथे पोर एकटी आहे ! "

" बरं ,तुम्ही जा लवकर ! मी घरातलं आवरून स्वयंपाक बनवते, तुमचा डबा तिथेच आणते ! थोडा उशीर होईल पण तिथेच थांबा ,घरी येऊ नका ! "

" का गं ? "

"काही नाही ,मला थोडं बाहेर जायचं आहे ! सामान आणायचा आहे! "

"अगं मग मी आणून देतो ! "

"अहो तुम्ही आत्ताच म्हणालात ना ,पोर एकटी आहे म्हणून ? तुम्ही जा मी बघते ! फक्त मी येईस्तोवर तिथेच थांबा ! "

" सीमा , काय चाललय तुझं ?"

"कुठे काय ?"

"सीमा ,तुला कुणी काही बोललय का ? "

" कशाबद्दल ?"

" रेवतीबद्दल?"

"हे बघा ,तुम्हो आता तिच्याजवळ असणं जास्त गरजेचं आहे ,बाकी तिथे आल्यावर सांगेन मी सगळं ! जा लवकर ! "

रेवतीचे बाबा स्कूटर घेऊन निघाले ,हॉस्पिटल कडे रवाना झाले !

सीमाताईंनी भराभर घरातलं आवरलं . थोडा स्वयंपाक केला . दार बंद केलं ! आणि कुलकर्णी काकूंकडे गेल्या .

" काकू sss "

काकू बाहेर आल्या .

"काय ग सीमे तू कशी काय ? " काकू.... "त्या काकूंजवळ जाऊन हळूच बोलल्या , "मी त्या वाड्यात जातेय!"

"अगं ,कायम्हणतेस ? वेडी का खुळी तू ? तुला काय गंमत वाटली ?"

" नाही काकू ! पण माझ्या मुलीचा जीव वाचवण्यासाठी मी माझा जीव ही देईन ! "

"आणि त्याने ही उपयोग नाही झाला तर ? "

" काकू! "

सीमाताईंना काकूंचं बोलणं आवडलं नाही !

"हे बघ ,चिडू नकोस ! जीव देऊन जीव वाचवणं काही शहाणपणाचं नाही ! चल,मी तुझ्या सोबत येते ! "

"काकू, तुम्ही कशाला जीव धोक्यात घालताय ? "

"अगं ,माझं काय मेलीचं ?माझं आयुष्य जगून झालंय ! पण तुझ्यावर मुलीची संसाराची जबाबदारी आहे !"

चल बघू! तसा ही वाडा माझ्या पायाखालचा आहे ! बरीच वर्ष झाली ,पण हरकत नाही ! चल ... ! "

➤➤➤➤➤➤

[४]

दोघी सावधगिरीने निघाल्या . त्यांनी तोच मार्ग निवडला जिथे रेवती लपली होती. झाडाआड ! त्या बाजूने वाड्याच्या भिंतीची पडझड झाली होती . असा चोरटेपणा जन्मात केला नव्हता . पण आज नाईलाज होता .

एका निष्पाप मुलीचा जीव वाचवायचा होता ! त्यांनी देवाला हात जोडून माफी मागितली . भिंत ओलांडून वाड्यात प्रवेश केला . आपण जे करतोय ते योग्य की अयोग्य ते नंतर समजणार होतं .

आता विचार करून उपयोग नव्हता . वाड्याच्या दाराला भलं मोठं कुलूप होतं !

" आता गं ? हे आपल्या लक्षातच आलं नाही ! "

काकू ,एवढा मोठा वाडा कुणी असाच सोडेल का ? चला बाहेरून तरी बघू !"

" त्यांनी वाड्याच्या बाहेरील बाजूने वळसा घातला . मागच्या बाजूने एक लाकडी जिना होता .दरवाजा मोडकळीस आला होता . सीमाताईंनी थरथरत हात पुढे केला .दरवाजा ढकलून बघितला ! दुसऱ्याच्या घरात असं जायचं ? लपून छपून ? सीमाताईंना अपराधीपणा खात होता . पण पर्याय नव्हता , निदान त्यांना तरी हा एकच मार्ग वाटत होता ,मुलीचा त्रास कमी करण्याचा !

दरवाजा ढकलून बघितला , करकरत दरवाजा उघडला गेला तेवढे काही क्षण जीवघेणे होते . जिन्यावर अंधार होता .दिवसा ही अंधार ! मग रात्री ? विचार करून उपयोग नव्हता . लाकडी जिनायांच्या पावलांनी करकरत होता .

"सीमे , आपण सोबत काही आणायला हवं होतं ."

"म्हणजे ?"

"हेच काही बॅटरी वगैरे !"

दोघी हळू हळू बोलत होत्या .

"अहो काकू आपल्याला काय माहित? या भागात अंधार असेल म्हणून ? तो ही दिवस ढवळ्या ?"

"हो गं , माझं मेलीचं लक्षातच नाही ! "

"जाऊ द्या काकू ! नका मनाला लावून घेऊ ! तुम्ही सोबत आलात हे काय कमी आहे ? "

दोघी अडखळत ठेचकाळत वर पोहोचल्या . वर एक खोली असावी ,निदान दरवाजा तरी एकच होता आत गेल्यावर कळणार होतं .या दाराला ही कुलूप नव्हतं .

"काकू ,याचा अर्थ काय ? इथे कुणी लपून छपून तर राहत नसेल ? त्यांचीच मुलगी असावी ! "

"सीमे वेड्यासारखं बोलू नकोस ! माणसांच्या अस्तित्वाची इथे एक ही खूण नाही . निदान सध्या तरी नाही ! कदाचित अगोदर कुणी राहिलं ही असेल ,पण काही अनुभवाने पळ काढला असेल ! चल ,आता इथवर आलोच आहोत तर पाहून घेऊ ,आत जाऊन बघू ! "

काळीज धडधडत होतं ! एक निर्धार करून सीमाताईंनी दरवाजा ढकलला .

आणि... एक जीवघेणी कळ काळजात उठली ! कुणीतरी लहान मुलगी हसत हसत आतल्या बाजूला पळाली ,असा त्यांना भास झाला ! भास की सत्य ? कसं कळणार ?

जे बघितलं ते खरं मानायला अनुभवाची शिदोरी कमी पडत होती ,आणि खोटं किंवा भास मानायला मन तयार नव्हतं !

" सीमे , निघ इथून ! दार बंद कर ! "

"पण काकू ..... ! "

" सीमे ... निघ म्हणते ना ! " काकूंनी सीमाताईंना हात धरून ओढलं .आणि दार बंद करून कडी लावली . जिना उतरून खाली आल्या .आता वळसा घालून जायची गरज नव्हती . तशाच घराच्या दिशेने वळाल्या . घरी पोहोचेपर्यंत घामेघूम झाल्या होत्या !

त्या सरळ सीमाताईंच्या घरी गेल्या .

सीमाताईंनी तांब्या ग्लास भरून आणला . दोघी बसल्या . घोट घोट पाणी पिलं .

"काकू ? आता हो काय करायचं ?"

"सीमे ,तुला काय वाटलं ? हे काय एका दिवसाचं काम आहे ? अगं ,आपलं नशीब चांगलं ,आपण परत तरी आलो ! "

"अहो काकू ...पण ... "

" हे बघ सीमे ,तो विषय आता बंद कर ! स्वयंपाक झालाय का? "

"हो काकू ,झालाय . दोन घास खाते आणि निघते . तुम्हीही घ्या . "

" नाही,माझं जेवण मी बनवून ठेवलय . तू खा आणि निघ ! वाटल्यास तोवर मी बसते . "

सीमाताईंचं खाऊन होईपर्यंत काकू बोलत बसल्या . नंतर सीमाताईंनी डबा भरला . बाहेर येऊन दार लावलं .कुलूप लावून चावी काकूंकडे दिली .

" पोरीची काळजी घे . जा लवकर निघ ! १ वाजून गेलाय ! सीमाताई निघाल्या . पण आता लक्ष सारखं वाड्याकडे जात होतं . भीतीयुक्त कुतूहल निर्माण झालं होतं .

त्या विचारातच त्या हॉस्पिटलला पोहोचल्या . रेवती शुद्धीवर आली होती .! उठून बसली होती . ते बघून सीमाताईंचा जीव भांड्यात पडला . त्या तिच्याजवळ बसल्या .

"बाळा ? कशी आहेस ?"

" आई ,तू तिला बघितलं ? "

एक जोरदार धक्का बसला , केशवरावांना आणि सीमाताईंना ! कारणं वेगवेगळी होती ,हिला कसं कळालं ? हा सीमाताईंचा प्रश्न होता ,आणि सीमाताईंना त्या मुलीबद्दल माहिती आहे हेरेवतीला कसं कळालं ? हा केशवरावांचा प्रश्न होता .

" बाळा,उठतेस का ? वरणभात आणलाय ! थोडा खातेस ? नाहीतर बटाट्याची भाजी पोळी खा . "

" आई तू तिला बघितलंस ना !.....खरं खरं सांग ! "

सीमाताई खोटं खोटं रागावल्या .

"रेवती ? बाळा काय हा वात्रटपणा ? कुणाबद्दल बोलतेस ? मुकाट्याने जेवण कर आणि झोप ! "

" आई ,तू घाबरलीस ना ? ..... " रेवतीच्या चेहेऱ्यावर विचित्र हास्य तरळलं .

" की बाबांना घाबरतेस ? बाबा ही तिथे जाऊन आली तुम्हाला न सांगता ! "

केशवराव काय समजायचं ते समजले . पण आता त्या बद्दल बोलण्याची ही वेळ नव्हती .

" रेवती ,बाळा तुला बरं वाटत नाही ना ! म्हणून असं वाटतंय ! हे बघ जास्त विचार करू नकोस ! छान पैकी जेवण कर ! औषध घे आणि झोप काढ ! मी संध्याकाळी डॉक्टर काकांशी बोलतो आणि मग शक्य झालं तर आपण आजच घरी जाऊ ! "

केशवरावांचं बोलणं ऐकून रेवतीच्या चेहेऱ्या वरील भाव बदलले . ती प्रचंड घाबरली ,

" नाही ! मला घरी नाही यायचं ! ती काल घरी आली होती ! ती आईच्या मागे मागे आज ही घरी आलीय ! आणि आई तिला घरात कोंडून आलीय ! "

"काय ?"

हा दोघांना मोठा धक्का होता .

"रेवती ,बाळा अगं काय बरळतेस ? " रेवतीच्या बाबांनी डॉक्टरांना आवाज दिला. नर्स धावत आली !

"काका ,काय झालं ? "

" प्लिज , जरा डॉक्टरांना बोलावता का ? ही बघा ना कशी विचित्र बोलतेय ! किती घाबरलीय ! "

"बाबा ,मी घाबरले ते तुमच्यासाठी ! तुम्ही घरी एकटे जाऊ नका ! ती आपल्या घरातच शिरलीय ! जो अगोदर घरात शिरेल ,त्याला ती स्टॅच्यू करेल ! आणि त्याचे माझ्या सारखे हाल होतील ! आई ,तुम्ही तिथे जायला नको होतं ! "

" काय ? तुम्ही ? "

" हो बाबा , ही आणि कुलकर्णी आजी दोघी तिथे गेल्या होत्या . तुम्ही इकडे आल्यावर ! आणि ती यांच्या मागे आपल्या घरी आली . "

"रेवती , बस झालं हं ! काय हा वेडेपणा ?"

" नाही बाबा माझं ऐका . जर तुम्हाला खोटं वाटत असेल तर एकटे घरी जा आणि अनुभव घ्या .नाहीतर दोघे तिघे सोबत जा , आई तू घरी जो स्वयंपाक केला होता ना तो जो उरलेला ,तो सर्व संपला असेल ! "

सीमाताई,केशवराव आणि नर्स तिघांचं डोकं सुन्न झालं होतं . तितक्यात डॉक्टर आले .

"केशव ,काय झालं ? "

"अरे माधवा , ही बघ ना कशी बडबड करतेय ? "

" रेवती ? बाळा काय झालं ? बरं वाटत नाहीये का ? "

"काका मी अगदी ठणठणीत आहे ! तुम्हाला स्टॅच्यू व्हायचंय का ? मग एकटे आमच्या घरी जा आणि खात्री करून घ्या . जर माझं म्हणणं चुकीचं वाटलं तर सरळ मला वेडी म्हणा ! मग तुम्ही द्याल ती शिक्षा भोगायला मी तयार आहे !"

"बरं बरं , तू म्हणतेस तर आपण तसं करू ! पण अगोदर जेवण करायचं ,मग औषध इंजेकशन घेऊन आराम करायचा . तुला घरी जायचंय ना ?"

रेवती पुन्हा बिथरली .

"काका ,मी घरी जाणार नाही . ती आमच्या घरात आहे ! "

"बरं , बरं ! मग आमच्या घरी येशील ? आमच्या घरी छोटा बाळ आहे. तुला

आवडतात ना लहान बाळ ? "

रेवतीची कळी खुलली .

" हो मला लहान बाळ खूप आवडतं ! "

"मग झालं तर ! आज संध्याकाळी तुम्ही सर्वांनी आमच्या घरी यायचं. "

"पण तुम्ही तर इथे वरच राहता ना ?"

" हो बाईसाहेब ,... " डॉक्टरांना तिचं कौतुक वाटलं .

" कसं आहे काही पेशन्टची तब्येत जास्त सिरीयस आहे ना ! मग त्यांची काळजी नको का घ्यायला ? रात्री अपरात्री त्रास झाला मग ? म्हणून मी इथेच थांबतो . आता बाळाला तर इथे ठेऊ शकत नाही . म्हणून त्याला घरी त्याच्या मम्मी जवळ ,आजी बाबांजवळ ठेवलंय ! मग येशील ना संध्याकाळी ? "

" हो नक्की येईन ! बाबा जायचं ना ?"

रेवतीचा प्रसन्न चेहेरा पाहून सर्वांना बरं वाटलं .

" हो बाळा ,जाऊ आपण ! पण तू अजून जेवली नाहीस ! जेऊन घे अगोदर ! "

"सीमा दे तिला ! मी आलोच ! "

डॉक्टर आणि केशवराव बाहेर आले , सीमाताईंनी रेवतीला जेवायला वाढलं आणि रेवतीच्या बाबाना आवाज देण्याकरता रूमच्या बाहेर आल्या .

"अहो ,तुम्ही ही जेऊन घ्या ना ! "

"तू अगोदर इकडे ये ! हे सर्व काय चाललंय ? मला काही कळेल का ? "

"हे बघा, ती जेवतीय , तुम्ही ही तिच्या सोबत बसा . तर ती जेवेल ! ती झोपली की बोलू आपण ! चला ! " केशवरावांनाही ते योग्य वाटलं .

"माधवा ,मी नंतर बोलतो तुझ्याशी ! "

"ठीक आहे ! " एवढं बोलून डॉक्टर निघून गेले.

केशवराव आणि सीमाताई रूममध्ये आले . तेव्हा रेवती जेवण न करता खिडकी जवळ उभी होती .

"रेवती,चल बाळा ,बाबांसोबत जेवण कर ! "

रेवतीला बरं वाटलं असावं ! तिचे बाबा म्हणजे तिचा जीव कि प्राण होते . ती जेवता

जेवता मधेच काही बोलायची मधेच शांत बसायची .

थोड्या वेळात औषध इंजेकशन घेऊन रेवती झोपली .

"सीमा ,आता बोलशील ?"

सीमाताईंनी हळू आवाजात सर्व सांगितलं . खरं की खोटं, सत्य की भास ? हा विषयच नव्हता .रेवतीने सरळ सरळ चॅलेंज केला होता . एकटे घरी जाऊ नका ! जाल तर दोघे तिघे सोबत जा ! उरलेला स्वयंपाक संपलेला असेल !

पर्याय एकच होता ,खात्री करणे ते ही आत्ताच ! पण सोबत न्यायचं कुणाला? सांगायचं काय? कुणीही हसेल वेड्यात काढेल !

"सीमा काय करायचं ? "

"अहो मला वाटतं आपण दोघांनी जावं ,नर्सला लक्ष ठेवायला सांगू हिच्यावर ! इथे तर काही धोका नाही . कुलकर्णी काकूंकडे जाऊ ,त्यांच्या कानावर घालू . वाटल्यास त्यांना सोबत घेऊ . फक्त अडचण एकच आहे ,त्या इकडे येणार होत्या .त्यांची आपली चुका मूक नको व्हायला . "

"चल बघू ! "

नर्स ला सांगून दोघे निघणार तेवढ्यात मागून आवाज आला. "आई ,बाबा ,काळजी घ्या ! मी खरं तेच सांगतेय ,माझ्यावर विश्वास ठेवा . "

"हो बेटा , काळजी करू नकोस , आम्ही लगेच परत येतो . आणि तुझ्यावर विश्वास आहे म्हणून तर दोघे जातोय ना ? नाहीतर एकटा नसतो का गेलो ? तू घाबरणार नाहीस ना ? "

" नाही ! फक्त तुम्ही घाबरू नका ! "

" बरं ,बरं ,झोप आता ! जाऊ आम्ही ? "

" हो हो ! नीट जा आणि लवकर परत या ! "

➤➤➤➤➤➤

[५]

नर्स रूम मध्ये थांबली . हे दोघे घराकडे रवाना झाले . स्कूटर होतीच . त्यामुळे लवकर

घरी पोहोचले .सरळ कुलकर्णी काकूंकडे गेले .

" काकू ?"

" सीमे आलीस ? आणि दोघे आलात ? काय झालं ? रेवती बरीय ना ? तिच्याजवळ कोण आहे ? "

" काकू ,आत चला दोन मिनिट ! " काकू ,समजल्या काहीतरी झालंय !

" सीमे काय झालं ? या बसा ! "

सीमाताईंनी सर्व काही सांगितलं . काकूंनी त्यांना पाणी दिलं .पाणी पिऊन झाल्यावर लगेच म्हटल्या ,

"चला !"

काकू लगेच उठून निघाल्या . चार वाजून गेले होते .सीमाताई व केशवराव पटकन उठले . तिघे बाहेर पडले . काकूंनी दाराला कडी घातली . त्याच तरातरा पुढे निघाल्या . चावी त्यांच्या जवळच होती.

त्यांनी घाईघाईत दार उघडलं आणि आत लोटलं . कुणीतरी पळत पळत आतल्या खोलीत गेलेलं त्यांना जाणवलं. काकू मागे सरकल्या !

" काकू ssss " सीमाताई कुजबुजल्या .

"सीमे ,ती आतच आहे ! तुझी पोरगी खरं सांगतेय हो ! आपण तिकडे जायला नको होतं ,नसती ब्याद मागे लागली !"

" पण काकू ,आत तर जावंच लागेल ना ! घर आपलं आहे ! बाहेर का राहायचं ? "

" सीमा थांब,दोघे सोबत जाऊ ! काकू, तुम्ही थांबता बाहेर ? " केशवरावांनी विचारलं .

" नाही मी पण येते !"

" तुम्ही स्वयंपाकघरात जा ,मी त्या खोलीत बघते ! "

" काकू ,विषाची परीक्षा घेऊ नका ! आमच्या सोबत या ! नाहीतर इथेच थांबा ! "

काकू त्यांच्या सोबत गेल्या .स्वयंपाक घरातील ओट्यावर स्वयंपाकाची भांडी अस्ताव्यस्त पडली होती . कुणीतरी अधाशासारखं खाल्लं असावं . उष्ट ,खरकटं खाली पडलं होतं . सीमाताईंना आश्चर्य वाटलं . आपण जेवण करून सर्व नीट झाकून ठेवलं होतं. मग आता ?

" अहो .... सीमा ,काहीच बोलू नकोस ! "

" आपण निघू इथून चल ! "

"अहो पण हे आवरावे लागेल ना ! घर आपलं आहे ! जरा थांबा ! "

सीमाताई आवरायला लागल्या . काकू ही पुढे आल्या . दोघीनी मिळून पटकन आवरलं .

" चला निघा आता ! "

" अहो पण ती मुलगी ? ..... "

" सीमा निघ म्हणतो ना , तिचं बघू नंतर काय करायचं ते ! "

तिघे बाहेर आले . केशवरावांनी कुलूप लावलं . चावी काकूंकडे दिली .

"काकू ,आम्ही रात्री शक्यतो डॉक्टर माधवकडे असणार ! तुम्ही काळजी घ्या . रात्री काही वाटलं तरी इकडे फिरकू नका ! "

" सीमे, मला रेवतीला बघायचं होतं गं ! " काकू म्हणाल्या . सीमाताई विचारात पडल्या .

" अहो तुम्ही जा स्कूटर वर , आम्ही रिक्षाने येतो ."

" ठीक आहे ."

" काकू चला " तिघे निघाली . हॉस्पिटलला पोहोचले . रेवती उठली होती खिडकी जवळ उभी होती .बाहेर बघत होती एकटक .

" बाळा ,केव्हा उठलीस ? " रेवतीने उत्तर दिलं नाही . सीमाताईंनी पुन्हा विचारलं .

" बाळा,केव्हा उठलीस ? "

" आई ती घरातच होती ना ? "

सीमाताईंना कळेना हे सर्व हिला कसं समजलं ?

" हे बघ बाळा ,जास्त विचार करू नकोस ! ती पण लहान आहे की नाही ? तिला आपलं घर आवडलं असेल ! म्हणून ती आली असेल ! थोडे दिवस राहील आणि निघून जाईल ! "

" नाही आई ! ती जाण्यासाठी आलेली नाही ,ती मला नेण्याकरिता आलेली आहे ! "

" रेवती sss" सीमाताई कडाडल्या .

" आई ,चिडू नकोस ! मी जाणार हे निश्चित ! तू काल रात्री जे बघितलं तेच खरं होतं ! "

" रेवती ? "

काकूंनी आवाज दिला तसं रेवतीने वळून बघितलं .

" आजी तुम्ही ?"

आणि ती जाऊन त्यांना बिलगली .

" आजी ती मुलगी मला न्यायला आलीय ! मला भीती वाटतीय ! " इतकं बोलून ती रडायला लागली.

काकू तिला थोपटत राहिल्या . नंतर बेड जवळ घेऊन गेल्या , तिला बसवलं , केशवरावही पुढे आले,

" रेवती,बाळा असं रडायचं नाही आपण सगळे आहोत ना ? आणि आपण घरी जायचंच नाही ! दुसरीकडे राहू,मग झालं ?"

रेवतीला बरं वाटलं असावं ,ती हळूहळू शांत झाली .

"रेवती , तू मगाशी काय म्हणालीस ? मी बघितलं ते खरं होतं म्हणजे ? " सीमाताईंनी प्रेमाने विचारलं.

" आई तिने मला स्टॅच्यू केलं होतं .ती जोवर ओव्हर म्हणत नाही तोवर मी पूर्ण बरी होणार नाही . तिला ओव्हर म्हणायला सांग ना ! नाहीतर आज पण काल सारखच होईल !"

" रेवती हे बघ ,तू आता पूर्ण बरी झाली आहेस ! आता आपल्याला इथून डॉक्टर काकांच्या घरी जायचंय तिथे लहान बाळ आहे ना ! त्याच्या सोबत खेळशील ना ? "

"हो ! "

" चला निघायचं ना ? " केशवरावांनी तिला विचारलं .

रेवतीचा चेहेरा पुन्हा खुलला .

केशवरावांनी बाहेर येऊन डिस्चार्ज पेपरव सह्या केल्या . आणि बिल पे केलं. डॉक्टरांच्या कॅबिनला जाऊन डॉक्टरांना भेटले .

"अरे केशव तू बिल भरलस ? कुणी मागितलं ? "

डॉक्टर रागाने म्हणाले .

" हे बघ माधवा ,मैत्री मैत्रीच्या जागी ! व्यवहार व्यवहाराच्या जागी ! आणि तसं ही बिल काही फार नव्हतं . बरं ते जाऊ दे ,मला तुला काही सांगायचंय . ....."

केशवरावांनी भरकन त्यांचा अनुभव सांगितला . आणि रेवतीची मानसिकता ही !

" माधवा ,पोरगी घाबरलीय रे ! कळत नाही यातून कसं बाहेर काढावं तिला ! "

" चल निघू आपण ! लहान बाळासोबत दोनतीन दिवस राहील तर सर्व काही विसरून जाईल . तोवर आपण तुझ्या घरी नेमका काय प्रकार चाललाय त्याचा शहानिशा करू ! जास्त विचार तू ही करू नकोस ! चल ! "

दोघे कॅबीनच्या बाहेर आले .

" वहिनी ,चला ! "

" रेवती ? बाळाकडे जायचंय ना ? आणि या कोण ? "

" या आमच्या कुलकर्णी काकू ! "

" अच्छा ,नमस्कार काकू ! तुम्हीही आमच्या घरी चला ! "

" नाही आज नको ,पुनः येईन केव्हा तरी ! संध्याकाळ झालीय, दिवे लागणीची वेळ ! घर बंद नसावं ! बरं सीमे मी जाते . काळजी घे !"

" काकू चला सोबत, माझी कार आहे ,तुम्हाला सोडून मग पुढे जाऊ ! " सर्व जण निघाले .

➤➤➤➤➤➤

[६]

काकूंना घरी सोडलं , जाता जाता डॉक्टरांची नजर वाड्याकडे गेली .

" अरे हाच तो वाडा ना ! "

डॉक्टरांनी हळूच विचारलं . रेवती आईच्या मांडीवर डोकं ठेऊन झोपली होती . पण वाड्याचा उल्लेख होताच ती ताडकन उठून बसली .

" मला घरी जायचंय ,सोड मला ! "

" रेवती sss "

केशवराव जोरात ओरडले . तशी रेवती भानावर आली .

" बाबा ,अहो काय झालं ? केवढ्याने ओरडताय ? "

केशवरावांना दरदरून घाम फुटला . त्यांनी खिशातून रुमाल काढला . आणि घाम टिपला .डॉक्टरांनी त्यांना हाताने थोपटलं .

केशवराव विचार करत होते . हि जर एवढ्या लांबून इतकं तांडव करते तर मग आपल्या घरी गेल्यावर काय करेल ? अडचण घरात आहे की वाड्यात ?

" माधव ,तो वाडा कुणाचा आहे ते शोधलं तर ? आणि .... " तोवर डॉक्टरांचा बंगला आला होता . त्यांनी कार पार्क केली . सर्व जण खाली उतरले . डॉक्टरांच्या मिसेस ने आणि आई वडिलांनी त्यांचं स्वागत केलं .

" रेवती ,बाळा कशी आहेस ? "

"आजी ,बाळ कुठेय ?"

रेवतीने उत्साहाने विचारलं .

" आतल्या खोलीत ! पाळण्यात झोपलाय ! बघायचंय तुला ? चल मग ! "

" या ना ! "

रेवती उड्या मारत आत पळाली . डॉक्टरांच्या आईच्या मागे ! सर्वजण आत आले !

" या बसा ! " केशवराव ,डॉक्टर आणि त्यांचे वडील हॉल मध्ये बसले . तर सीमाताई डॉक्टरांच्या मिसेस बरोबर म्हणजे स्नेहल बरोबर किचनमध्ये गेल्या .

बाळ झोपलं होतं . रेवतीने दुरूनच बघितलं आणि नंतर घरभर हुंदडायला लागली . स्नेहलने पोहे केले . नंतर चहा झाला . बोलता बोलता डॉक्टर आणि माधव बाहेर आले .

" हां ,केशव तू काय म्हणत होतास त्या जागेचं ? "

" अरे मी असं म्हणत होतो की तो वाडा कुणाच्या मालकीचा आहे ते शोधलं तर ? "

" अरे त्यात काय शोधायचंय ? त्या काकूंना माहित असणारच ! त्या सांगतील की !"

" अरे बाबा आपल्याला सध्या मालक कोण आहे ते शोधायचं आहे ! ज्यांची भूतं झाली

त्यांच्याबद्दल नाही म्हणत मी ! "

" आणि काय करायचं ? "

" त्या वाड्यात भुताटकी आहे ! तो जर पडला तर ती नकारात्मक ऊर्जा नष्ट होईल ! होईल की नाही ? "

" एक मिनिट ,या विषयी आपण बाबांशी बोलूयात ! " डॉक्टरानी त्यांच्या वडिलांना बोलावलं .

" काय रे माधवा ? "

ते बाहेर येऊन म्हणाले . " बाबा दोन मिनिट या ना ! "

बाबा येऊन त्यांच्या शेजारी बसले .

" केशव , तू सांगतोस ? " डॉक्टर म्हणाले .

केशवरावांनी बोलायला सुरुवात केली . दोन दिवसात जे काही घडलं ते सर्व काही सांगितलं .

" केशवा ,तू जसं म्हणतोयस ,तसं नाही झालं तर ? "

" म्हणजे ? "

" अरे तू म्हणतोयस तो वाडा पडायचा , म्हणजे ती भुताटकी नष्ट होईल ! पण त्याचा काय भरवसा ? तिथली ती ऊर्जा दुसरीकडे शिफ्ट होणार नाही कशावरून ?

  इनफॅक्ट मला तर वाटतंय तसंच होतंय ! झालंय ! म्हणून ती मुलगी तुम्हाला तुमच्या घरात दिसली . त्यापेक्षा तू दुसरीकडे का नाही शिफ्ट होत ?"

" काका ,कसं ए ,प्रश्न माझ्या एकट्याचा नाहीय ! किंवा माझ्या कुटुंबाचा नाही ! पूर्ण चाळीचा आहे ! ते सर्व कुठे जातील ? "

" अरे पण त्यांना काही त्रास नाही ना ? "

डॉक्टरांचे वडील गंगाधर पंत म्हणाले .

"आज नाही ,पण उद्या होणार नाही कशावरून ? " केशवरावांनी शंका मांडली .

" पण ती जी काही भुताटकी आहे ती तिथेच नष्ट करावी लागेल ! माधवा , मी काय म्हणतो ? आपल्याला नवीन हॉस्पिटलसाठी ती जागा कशी आहे ? "

" बाबा आपण अजून ती जागा बघितली नाही ! म्हणजे लोकशन चांगलंय ,पण ती जागा

नेमकी किती आहे ? रेट काय आहे ?

आपलं बजेट ,ते ही बघावं लागेल ! आणि असंही आपलं गाव खूप मोठं नाही ! मग मोठं हॉस्पिटल बांधून काय करणार ? शिवाय तिथं भुताटकी आहे म्हणतात ! आपण नाही मानत ,पण समजा एखाद्या पेशन्टला काही त्रास झाला मग ? "

डॉक्टरांचा प्रश्न समर्पक होता ! केशवराव ही विचारात पडले . थोडे नाराज ही झाले . त्यांची एवढी आर्थिक क्षमता नव्हती की ते एकट्याने एवढी प्रॉपर्टी खरेदी करू शकतील ! डॉक्टरांच्या ते लक्षात आलं .

" हे बघ केशव ,निराश होऊ नकोस ! आपण काही ना काही मार्ग काढू ! "

तेवढ्यात सीमाताई आणि स्नेहल बाहेर आल्या .स्नेहलने मिश्किल पणे विचारलं ,

" काय गप्पा चालल्यात ? "

बसण्याची व्यवस्था होतीच , त्या ही बसल्या . "स्नेहल .... " डॉक्टरांनी सर्व काही सांगितलं .

" अहो काय तुम्ही ? हे भुताटकी वगैरे सर्व थोतांड आहे ! जुन्या वास्तू म्हटलं की थोडी फार नकारात्मक ऊर्जा असणारच ! मी समजू शकते ! पण अगदीच भुतं वगैरे म्हणजे जस्ट इम्पॉसिबल ! "

" त्यापेक्षा आपण या गोष्टीचा फायदा करून घेऊ ! तिथे हॉस्पिटल ,शॉपिंग मॉल , हॉटेल नाहीतर स्कूल असं काही बांधू शकतो ! जे या गावातील बेस्ट असेल ! " - स्नेहल

आता डॉक्टर बजेटचं काही बोलले नाही . हे केशवराव आणि गंगाधरपंतांच्या लक्षात आलं . केशवराव नाही पण गंगाधर पंत बोलले .

" पण सुनबाई ,बजेटचं काय ? "

" एक मिनिट , मी आईंना बोलावते . " इतकं बोलून स्नेहल डॉक्टरांच्या आईला बोलवायला गेली . सोबत सीमाताई ही गेल्या . कारण बाळाला आणि रेवतीला संभाळणारं कुणी हवं ना !

केशवरावांना स्नेहलचा स्वभाव माहित होता . आणि आवडत ही होता . ती सासू सासऱ्यांना डावलून परस्पर काही करित नसे . त्यांचा मान पहिला ! त्यामुळे गंगाधरपंत आणि त्यांची पत्नी काशीबाई दोघे ही तीला प्रेमाने वागवत ,अगदी मुलीसारखं !

स्नेहल आणि काशीबाई बाहेर आल्या . आता स्नेहल ने त्यांना इत्यंभूत माहिती दिली . व जागेचा प्रस्तव मांडला आणि आपली कल्पना ही ! तशा काशीबाई गंभीर झाल्या . "

आइ काय झालं ? माझी कल्पना तुम्हाला आवडली नाही का ? "

" तसं नाही स्नेहल ,तुझी कल्पना छानच आहे . पण एक लक्षात घे ! तुझा या गोष्टींवर किती विश्वास आहे माहित नाही ,पण माझा अनुभव वेगळा आहे .

आपण ती वास्तू ,तो वाडा पाहिल्याशिवाय काही सांगू शकत नाही आणि केशवा ती मुलगी तिची वास्तू सोडून तुझ्या घरी येऊन राहील असं वाटत नाही !

पण तुम्ही तिघांनी पाहिलं म्हटल्यावर ते खोटं आहे किंवा भास आहे असं ही मी म्हणणार नाही ! तिला जे काही साध्य करायचं ते केल्यावर ती ऊर्जा स्रोताकडे परतल्याशिवाय राहणार नाही ! "

" म्हणजे ?"

" हे बघा , मला वाटतं हा विषय आत्ता नको ! आपण अगोदर जेवण उरकू नंतर जेवण उरकलं की सीमा राहिलंच आपल्या बरोबर ! तिचं ही मत घेऊ ! उद्या अगोदर तुझ्या घरी जाऊ !

आपले गुरुजी आहेत ! त्यांना वेळ असेल तर त्यांना घेऊन जाऊ ! तोवर तुम्ही त्या मालकाची चौकशी करा ,ती विक्रीकरिता कोणाकडे आहे ते बघा ! शक्य झाल्यास उद्याच ते काम उरका ! तूर्तास एवढे पुरे ,असे मला वाटते ! "

त्यांचा सल्ला सर्वांना पटला . घाई करून उपयोग नव्हता . सर्व जण आत आले . रेवती लहान बाळासोबत रमली होती. काही वेळाने स्वयंपाक झाला . रेवती जेवण करून झोपली . तिला औषधांची गरज पडली नाही . मोठी मंडळी सोबत जेवायला बसली .

जेवण करून आवर सावर झाल्यावर काशीबाईंनी विषय काढला .

" सीमा तू त्या वाड्याबद्दल काय सांगू शकशील ? "

" तू तिथे गेली होतीस ना ? "

" काकू वाड्यात नाही ,पण वाड्या सभोवतालचा परिसर नजरेखालून घातला . मागून एक जिना आहे . वर एक खोली आहे ! एक आहे की जास्त तेवढं समजलं नाही !

पण आम्ही दरवाजा लोटताच त्या मुलीचं अस्तित्व आम्हाला जाणवलं . आणि आम्हाला तिथून काढता पाय घ्यावा लागला . पण तरीही ती मुलगी आमच्यामागे घरी पोहोचली ! "

काशीबाईंना सीमाताईंचा बोलण्याचा रोख आवडला नाही

" सीमा ,एक सांगू ? राग मानू नकोस ! तू जिचा लहान मुलगी म्हणून उल्लेख करते

आहेस , तो लहान मुलगा म्हणजे एक भ्रामक आकार आहे ! त्याला फसू नकोस !

ती किती ताकदीची आहे .तिच्यामागे कोणती शक्ती आहे ते समजणं सोपं नाही ! तूच विचार कर , मेलेली मुलगी तुम्हाला समोर जिवंत दिसतेय ! किती भयंकर प्रकार आहे हा !

ते ही दिवसा ! ती किती विनाश करेल ,करू शकेल ते आपण सांगू शकत नाही . विनाकारण घबराट पसरायची . त्यातच कुणाचं काही कमी जास्त व्हायचं . आणि दोष आपल्यावर यायचा ! "

सीमाताईंना अपराधीपणाची भावना खायला लागली . त्या खाली मान घालून बसल्या. काशीबाईंना त्यांची अवस्था समजली . त्यांनी सीमाताईंच्या डोक्यावरून मायेने हात फिरवला .

" सीमा ,हे बघ ,स्वतःला किंवा रेवतीला यासाठी दोष देऊ नकोस . ती शक्ती पुन्हा जागृत झाली म्हणजे ती आज ना उद्या तुमच्यापर्यंत पोहोचणारच होती ! आणि तशी ती पोहोचली ही !

त्यात तू तिथे गेल्याने तिचा मार्ग सुकर झाला किंवा तिला दिशा मिळाली एवढच ! आणि आपल्याला ही हालचाल करायला वेळ मिळाला . हेच भाग्य समज ! "

बोलता बोलता बरीच रात्र झाली . डॉक्टर हॉस्पिटलला केव्हाच रवाना झाले होते . एक एक करत ही मंडळी ही झोपेच्या स्वाधीन झाली .

➤➤➤➤➤➤

[७]

रात्री रेवती अचानक उठून रडायला लागली .

सीमाताई घाबरल्या . " रेवती ,काय झालं ? "

रेवती काही बोलायला तयार नव्हती . ती रडत राहिली .

" बाळा ,सांग ना काही दुखतंय का ? "

" आइ ,आज्जी गेल्या ! "

सीमाताईंना नेमकं कळेना की ही काय बोलतेय ?

" बाळा , झोप बरं ,रडू नकोस ! "

" आई ,कुलकर्णी आज्जी देवाघरी गेल्या ! "

" काय ? "

सीमाताईंना हा मोठा धक्का होता . त्या घाबरून बाहेर आल्या . बाहेरच्या हॉल मध्ये ! केशवराव आणि गंगाधर पंत झोपले होते .सीमाताईंनी लाईट लावला .तशी त्यांची झोपमोड झाली .

" अहो ,रेवती बघा काय म्हणतेय ? "

" काय ?"

"काकू देवाघरी गेल्या म्हणे ! "

"कोण गं ?"

" कुलकर्णी काकू ! "

"काय ? " केशवरावांची झोप खाड्कन उडाली .

" चल ! "

रेवती अजून ही रडत होती .

" रेवती ,बाळा काय झालं ? "

" बाबा ,कुलकर्णी आजी देवाघरी गेल्या . "

" बाळा तुला स्वप्न पडलं असेल ! कुणाबद्दल असं वाईट बोलू नये ! "

" नाही बाबा , मी खरंच सांगतेय ! "

" बरं , तू झोप आता ! मी बघतो काय करायचं ते ! रडू नकोस ! "

सीमाताईंच्या डोळ्यांना अश्रूंच्या धारा लागल्या . त्यांच्या डोळ्यांसमोर काकूंचा चेहेरा यायला लागला . आपण तिथे जायला घाई केली . आपल्या मुलीचा जीव वाचवण्याच्या नादात ! ..... पुढचा विचार त्यांना करवेना !

त्यांना काकूंचं बोलणं आठवलं . जिवाच्या बदल्यात जीव देणं शहाणपणाचं नाही .

पण आपण तेच केलं होतं ! जाणते अजाणतेपणी ! मग आपण अजून जिवंत कशा ? त्यांना अचानक धक्का बसला .

'आपण रेवतीचं बोलणं खरं मानून चाललोय ! कदाचित काकू अजून जिवंत असतील . जे काही घडायचं आहे ते कदाचित घडायचे बाकी असेल ! किंवा घडत असेल , आपण थांबवू शकतो ?'

त्या घाईघाईत केशवरावांकडे आल्या आणि आपलं मत मांडलं . रात्रीचे दोन वाजले होते . केशवरावांनी त्यांच्या दुसऱ्या शेजाऱ्यांना अर्थात गुरवांना फोन लावला .

" दीपक ,जरा त्रास देतोय ! कुलकर्णी काकूंकडे जा आणि त्यांना माझा फोन आहे .असं सांग ना प्लिज ! "

"अहो काका ,पण तुम्ही आहात कुठे ? "

" ते मी सांगतो पण प्लिज तू जरा लवकर जा ना , अर्जंट आहे ! "

गुरव तातडीने काकूंकडे गेले दार वाजवलं . " काकू ? "

" काकू ? " काही वेळात काकूंनी दार उघडलं .

" काय रे ? कशाला उठवलंस ? "

" काकू .केशवकाकांचा फोन आहे ! "

" काय म्हणतोय तो ? "

" ते काही सांगितलं नाही ! तुम्हाला सांगणार आहेत ! "

" बरं चल !"

काकूंनी दाराला कडी लावली . आणि गुरवच्या घरी गेल्या ." हॅलो , केशव , अरे काय झालं ? "

काकूंचा आवाज ऐकून केशवरावांचा जीव भांड्यात पडला .सीमाताईंनी त्यांच्या हातातून फोन काढून घेतला . आणि रडत रडत बोलायला लागल्या .

" सीमे , काय झालं ? रेवती बरीय ना ? "

सीमाताईंना कसं सांगावं कळेना . पण सांगणं गरजेचं होतं . त्या भीत भीत म्हणाल्या

" काकू ,तुमच्या जीवाला धोका आहे . "

काकू क्षणभर काही बोलल्या नाही !

" कुणी सांगेतलं सीमे ? "

सीमाताईंनी भीत भीत रेवतीची वाक्य उच्चारली .

" सीमे , अगं काय तू पण ? एवढीशी पोर ती ! तिचं बोलणं कुठे मनावर घेतेस ? मी अगदी ठणठणीत आहे ! निवांत झोप ! माझी काळजी करू नकोस ! हं ? ठेव फोन आता ! "

सीमाताईंनी डोळे पुसले . केशवराव ही थोडे रिलॅक्स झाले 'देवा , आजची रात्र काढ ! काकूंना सुखरूप ठेव ! ' त्यांनी हात जोडले . पुन्हा सर्वजण झोपी गेले . इकडे गुरव च्या घरून काकू निघाल्या . तसं दिपकने विचारलं,

" काकू ,काय झालं ? "

" तुला ऐकायला वेळ आहे ?"

" काय काकू तुम्ही पण ? सांगा ना ! "

काकू सांगायला लागल्या ,तसा गुरव काळजी पूर्वक ऐकायला लागला . दीपक गुरव , २४-२५ वर्षाचा चुणचुणीत तरुण ! नोकरी निमित्त त्या गावी आला होता . सरकारी नोकरी होती !

या चाळीत एक खोली भाड्याने घेतली . फोन होताच . स्वभावाने मनमोकळा असल्याने सर्वांशी मिळून मिसळून वागायचा .

" अरे दीपक काल ना..... " काकूंनी जे काही झालं ते सर्व सांगितलं .

" पण काकू ,हे कसं शक्य आहे ? "

" अरे बाबा ,घडलय खरं ! शक्य अशक्य काय घेऊन बसलास ? "

" मग काकू तुम्ही आजच्या दिवस इथेच का झोपत नाही ? कशाला जीव धोक्यात घालताय ? "

" अरे दीपक ,मरण आज ना उद्या येणारच आहे ! तसं ही आता जगून काय करायचंय ? "

" तू ही झोप ! तुला सकाळी ड्युटी असेल ना ? दार लावून घे ! जाते मी ! "

काकू हळूहळू आपल्या घराकडे निघाल्या . त्या त्यांच्या घराजवळ पोहोचल्या हे दीपक ने बघितलं आणि दार बंद केलं . लाईट बंद करून झोपून घेतलं .

काकू दरवाज्यापर्यंत पोहोचल्या . दरवाजा ढकलला . आत गेल्या ,कडी लावली . आणि ... त्यांना आठवलं . आपण तर बाहेर ची कडी लावून दिपककडे गेलो होतो

.आणि तिथेच बसलो .

मग आल्यावर दार ढकललं आणि आत येऊन कडी लावली . मग बाहेरची कडी काढली कुणी ? पण आता उशीर झाला होता . जे काही घरात पोहोचायचं ते पोहोचलं होतं .

आणि असं काही नव्हतं की दरवाजा बंद असता तर ते आत येऊ शकलं नसतं . त्या अमानवी ,पाशवी शक्तीला दरवाज्याची एक फट ही पुरेशी होती .

पण कडी उघडण्याचं कारणच ते होतं ,की आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देणं ! जी काकूंना झाली होती की इथे अजून कुणी आहे !

काकू घाबरल्या आणि मागे फिरल्या . घाईघाईत दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला ! पण शक्य झालं नाही ! आपल्या मागे जे आहे ते भयावह आहे , आपण त्याचा सामना करू शकत नाही ! ही काकूंची खात्री झाली .

आणि दुसऱ्या क्षणी कानावर आवाज आला .

" आज्जी ! " आवाज ओळखीचा होता !

" रेवती ? .... ही इथे काय करतेय ?"

" रेवती ? " असं म्हणून काकू मागे वळाल्या . आणि त्यांना दिसणाऱ्या रेवतीच्या मागे जे होतं ,ते कल्पनातीत होतं ! भयानक होतं ! ते पाहून त्यांची बोबडी वळाली . डोळे भयाने पांढरे झाले ! समोर जी रेवती होती ती हसत हसत म्हणाली ,

" आज्जी ,स्टॅच्यू ..! " त्या रेवतीने स्टॅच्यू केलं पण .... आजीचा गेम ओव्हर झाला होता !

त्या उभ्या उभ्या मागच्या बाजूला कोसळल्या ,कधीही न उठण्यासाठी ...! रेवतीची आजी , चाळीची काकू , एक निरागस व्यक्तिमत्व अमानवी शक्तीच्या हातचं बाहुलं बनलं होतं !

डोळे सताड उघडे ठेऊन रेवतीच्या दिशेने हात करून त्यांचं अस्तित्व संपलं होतं . त्या कायमच्या स्टॅच्यु झाल्या होत्या ! स्तब्ध झाल्या होत्या ! शांत झाल्या होत्या !

➤➤➤➤➤➤

[८]

इकडे सीमाताई व केशवराव तळमळत राहिले ! एकीकडे काकू जिवंत होत्या ,हा आनंद तर दुसरीकडे रेवतीचं बोलणं चुकीचं ठरणार नाही ,असंही वाटत होतं ! आणि आपण आता दुसऱ्याच्या घरी आहोत ,त्यामुळे सोबत बसून साधं बोलू ही शकत नाही !

दोघे जरी जरी लांब लांब झोपले असले तरी त्यांच्या मनात एकच भाव होता ,तो म्हणजे भले ही रेवतीला इथे राहू देऊ , पण आपण इथे थांबणं योग्य नाही ! सकाळीच दिवस उजाडल्यावर इथून निघून जाऊ ! आणि तेच झालं ! दोघे ही सकाळी ५:३० ला न बोलता उठले !

आपलं आपलं आवरलं ! गंगाधरपंत आणि काशीबाई लवकर उठत ! लहान बाळ असल्याने स्नेहल थोडी उशिरा उठायची . कारण रात्रीतून सतरा वेळा झोपमोड व्हायची . बाळ असल्याने ! त्यामुळे तिला कुणी उठवत नसे ! रेवती ही झोपली होती .

" काकू ,आम्ही जाऊन येऊ का ? तोवर रेवती कडे लक्ष द्याल ? "

" हे बघ सीमे ,तिची काळजी करू नकोस ! आणि स्नेहल जर उठली असती तर मी ही तुमच्या सोबत आले असते ! ती उठेलच इतक्यात . तोवर थांबा हवं तर , सोबत निघू . "

" नको काकू ,आम्ही जातो आणि काही वाटल्यास तुम्हाला लगेच फोन करतो . "

" ठीक आहे , तसं कर हवं तर ! " झालं ,दोघे घाईघाईत निघाले .स्कूटर हॉस्पिटललाच होती ,त्यामुळे तिथवर रिक्षाने गेले . तिथून स्कूटर काढली ,डॉक्टरांना डिस्टर्ब करण्यात अर्थ नव्हता . ते सरळ घरी निघाले . चाळीत शांतता होती . दीपक निघायच्या तयारीत होता .

" काका तुम्ही ? सकाळी सकाळी ? "

" अरे काकू कशा आहेत ? "

" अगदी ठणठणीत ! "

" मग अजून दार बंद का ? त्या तर इतका वेळ झोपत नाहीत ? "

दिपकच्या ही मनात शंकेची पाल चुकचुकली . तो तातडीने काकूंच्या घराकडे धावला ,पाठोपाठ सीमाताई आणि केशवराव ! दरवाजा आतून बंद होता . दार ठोठावलं गेलं .पण उत्तर मिळालं नाही .दीपकने खिडकी उघडली . आत बघत काकूंना आवाज दिला . आणि बघताच राहिला पुन्हा आरोळी ठोकली ,

"काकू ssss ..."

सीमाताई आणि केशवराव बघतच राहिले . अडचण अशी होती की काकू दरवाज्या जवळ कोसळल्या होत्या !

त्यामुळे दरवाजा उघडणं शक्य नव्हतं . आणि खिडकीकडून त्यांचा फक्त पाया कडचा भाग दिसत होता . पर्याय एकच होता . एकतर खिडकीचे गज काढून आत प्रवेश करणं नाहीतर छताची कौलं काढून वरून उतरणं ! ' मागचा दरवाजा ?' हे विचार करेपर्यंत यांचा आवाज ऐकून चाळीतील इतर शेजारी एकत्र झाले .

' काय झालं म्हणून ? '

क्षणार्धात वार्ता पसरली . काही जण मागच्या दरवाज्याकडे पळाले . मजबूत दरवाजा ,काही केल्या हालत नव्हता . दीपक वेळ वाया न घालवता छतावर चढला . दोन तीन कौल काढले . आणि चाळकऱ्यांना उद्देशून म्हणाला ,

" कुणाकडे जाड दोरी आहे का ? "

दोन तीन जणांनी धावपळ करून जाड दोरी आणली . दिपकने दोरी कौलांच्या खाली असलेल्या आडव्या जाड बॉटम ला बांधली . आणि दोरीला लटकून घरात उतरला .

काकूंचा अवतार बघून तो भीतीने घामाघूम झाला ! पुढचा दरवाजा उघडणं शक्य नव्हतं . जोवर काकूंचं प्रेत तिथून हलवलं जात नाही तोवर !

दिपकने पटकन मागचा दरवाजा उघडला . जो तो मागच्या दरवाजाने आत शिरण्याचा प्रयत्न करू लागला . सीमाताई आणि केशवराव आत आले . काकूंना पाहून सर्वानांच धक्का बसला .

काकूंचे आधीच मोठे असलेले डोळे भीतीने अजून मोठे झाले होते ! हातपाय लाकडासारखे ताठ झाले होते ! त्यांच्याकडे पाहून असं वाटत होतं की या आपल्याकडेच बघताएत !

चारपाच जणांनी हिंमत करून काकूंचं प्रेत दारापासून दूर ठेवलं . पुढचा दरवाजा उघडला . सीमाताईंनी पुढे होऊन हिमतीने काकूंचे मोठाले डोळे बंद केले . तेव्हा कुठे सर्वाना धीर आला .

नाहीतर काकूंकडे बघायची कुणाची हिंमत होत नव्हती . आठ वाजून गेले होते . केशवरावांनी डॉक्टरांच्या घरी फोन करून काशीबाईंना घडलेला प्रकार सांगितला . त्या पण स्तंभित झाल्या .

" काकू फक्त रेवतीला सांगू नका ,नाहीतर ती घर डोक्यावर घेईल ! "

"केशवा , तिला सांगण्याची गरज नाही . ती केव्हाच उठून बसलीय . शांतपणे ,काही बोलत नाहीये , फक्त एक दोनदा एवढंच म्हणाली , मला आजीकडे जायचंय ! "

केशवरावांना कळेना काय बोलावं . तितक्यात डॉक्टर घरी आले ,

"आई काय झालं ? केशव आणि वहिनी कुठेत ? "

काशीबाईंनी फोन मुलाकडे दिला . केशवरावांनी डॉक्टरांना सर्व काही सांगितलं , त्यांना ही धक्का बसला .

"केशवा ,मी आलोच . काळजी करू नकोस ! "

"अरे तू कशाला येतोस ? रात्र भरचं जागरण आहे तुझं ,तू आराम कर ! आम्ही बघतो काय करायचं ते ! "

"अरे केशवा ,मी काही जॉब ला नाही तिथे जागरण करायला ! इमर्जन्सी साठी जातो फक्त ! ते ही आता स्नेहल बाळंतीण आहे म्हणून ,इथे झोपलं काय नि तिथे झोपलं काय सारखंच ! तशी ही रात्री झोप झालीय माझी , मी आलोच ! " एवढं बोलून डॉक्टरांनी फोन ठेवला .

"आई मी फ्रेश होतो तोवर चहा ठेवतेस का ? नाहीतर स्नेहल ला सांग ! "

" झोपलीय रे ती झोपू दे , मी ठेवते चहा ,तू फ्रेश हो तोवर ! "

यांचा आवाज ऐकून स्नेहल ला जाग आली . तिने घड्याळ बघितलं .

' माय गॉड ! इतका वेळ झोपले मी ! आणि पिल्लू ही शांत झोपलय . हं , म्हणूनच !'

तिला कसं तरी वाटलं . ती पटकन उठून बाथरूमकडे पळाली . नेमकी तिची आणि माधवची टक्कर झाली .

"सॉरी ! "

"अगं सॉरी काय ? इतका वेळ कुणी झोपतं का ? " डॉक्टर माधव डोकं चोळत म्हणाले .

" मी त्यासाठीच सॉरी म्हटलं ! "

"आणि मग हे डोकं फोडलं त्याचं काय करू ? " स्नेहलने पटकन इकडे तिकडे बघितलं आणि माधवच्या ओठांवर ओठ टेकवले ! माधवने ही तिला गच्च आवळलं !

" माधवा ,चहा झालाय रे ! "

" हो आई ! " माधव स्नेहलला कवटाळत म्हणाला .

"अरे सोड ना ! आई येतील ! " आणि आई आलीच ! तशी दोघांची तारांबळ उडाली . स्नेहल बाथरूम मध्ये पळाली आणि माधव चहा घ्यायला !....

स्नेहल तयारी करून आली तेव्हा घरातील वातावरण गंभीर होतं .

या वेळेस माधव त्याच्या बाळाजवळ असायचा ,त्याच्याशी खेळत ,नाहीतर त्याला झोपेतून उठवत ! स्नेहल त्याच्यावर चिडायची . तो त्या दोघांना चिडवायचा ! दोघे ही झोपाळू आहेत म्हणून ! नुसते झोपा काढतात ! पण आज असं काही झालं नव्हतं ! माधव शांतपणे तयारी करत होता . स्नेहल त्याच्याजवळ गेली .

"माधव ,काय झालं ? एवढी शांतता का ? ते काका ,काकू दिसत नाहीयेत ? "

माधव ने तिला शेजारी बसवलं आणि सर्व काही सांगितलं . ती ही अंतर्बाह्य थरारली . तिला सकाळची आठवण येताच स्वतःचीच लाज वाटली . हा कोणत्या मूडमध्ये होता आणि आपण याला ...

" सॉरी माधव !"

" कशाबद्दल ? "

"अरे तू मघाशी वेगळ्या मुडमध्ये होतास आणि मी तुला ..... "

"इट्स ओके स्नेहल ! तुला कुठे माहित होतं ? पण मला तर माहित होतं ,तरीही मी स्वतःला रोखू शकलो नाही ! जाऊ दे ,फरगेट इट ! " एवढं बोलून माधव अंघोळीला गेला .

थोड्याच वेळात डॉक्टर माधव ,काशीबाई ,रेवती निघाले .

"अरे थांबा ,मी ही येतोय ! " गंगाधरपंत म्हणाले .

" नाही . तुम्ही गुरुजींकडे जा . त्यांच्या कानावर घाला आणि वेळ असेल तर त्यांना सोबत घेऊन या ! "

" बरं बाई ,जशी तुमची आज्ञा ! "

"अहो काय हा चावटपणा ? काही वेळेचं भान आहे की नाही ? आम्ही निघतो ,तुम्ही या लवकर ! स्नेहल येतो गं ,काळजी घे ! "

"हो आई !" काशीबाईंनी बाळाची पप्पी घेतली आणि निघाले .

➤➤➤➤➤➤

[९]

तिघे चाळीत पोहोचले. चाळीत शोककळा पसरली होती. चाळ मोठी होती आणि सर्वांची घरे हि मोठी होती. भयावह शांतता ! दिपकने पुन्हा वर चढून दोर सोडला होता.आणि कौलं जागच्याजागी लावली होती.

डॉक्टर माधव पुढे झाले. काकूंना चेक केलं .

" पोलिसांना कळवलंय का ? "

" हो ! "

तितक्यात अँब्युलन्स आली आणि पोलिसही ! पंचनामा झाला, प्रेत उचललं गेलं. जुजबी चौकशी करून पोलीस निघून गेले.

आणि इतर चाळकरी सुद्धा ! काकूंचं मागे कुणी नव्हतं त्यामुळे कुणी रडण्याचा प्रश्नच नव्हता. दोन - तीन बाया शेजारधर्म म्हणून तोंडाला पदर लावून बसल्या होत्या . आणि सीमाताई एकट्या रडत होत्या !

कारण त्या स्वतःला जवाबदार धरत होत्या. काशीबाई त्यांच्याजवळ गेल्या .

" सीमा स्वतःला सावर ! तुझी पोरगी बघ सकाळपासून शांत शांत आहे ! "

सीमाताईंनी आयुष्यात पहिल्यांदाच रेवती कडे रागाने पाहिलं. आणि बडबडल्या ,

" तिनेच तर मारलय काकूंना , सटवी मेली ! त्याच दिवशी मेली असती तर बरं झालं असत ! "

काशीबाईंना सहन होईना ,

" अगं काय बोलतेस हे ? "

" नाहीतर काय हो ? मेली अजून किती जीव घेणार आहे, कुणास ठाऊक ? "

केशवरावांना सीमाताईंचं बोलणं जिव्हारी लागलं ! पण ते सत्यच होतं ! आपल्या मुलीमुळे इतरांचे जीव धोक्यात येत असतील , तर ते त्यांना नको होतं ! त्यांनी सरळ रेवतीचा हात धरला व ओढत बाहेर नेऊ लागले. डॉ. माधव ओरडले,

" केशवा, काय हा मूर्खपणा ? अरे एवढीशी पोर ती , ती काय कुणाला मारेल ? ती तर आमच्या घरी होती ! आणि समजा जे काही माध्यम आहे, त्याने तुझा किंवा वहिनीचा वापर केला असता , तर तू स्वतःला शिक्षा केली असती का ? वहिनींना शिक्षा केली

असतो का ? "

केशवरावांकडे या प्रश्नाचं उत्तर नव्हतं ! त्यांनी रेवतीचा हात सरळ सोडून दिला ! तो अशा प्रकारे सोडला कि सर्वांनाच त्यांची मानसिकता कळाली ! आता रेवती जगली काय आणि मेली काय , त्यांना फरक पडणार नव्हता. ते हताश झाले होते !

" केशवा, स्वतःला सांभाळ ! अरे ही तर सुरुवात आहे, पुढे अजून काय वाढवून ठेवले आहे , आपल्याला कल्पनाही नाही ! आणि आता रेवतीच्या असण्या - नसण्याने काही फरक पडणार नाही ! वहिनींनी त्या ठिकाणी जाण्यास खूप घाई केली होती ! भलेही त्यांचा हेतू चांगला असेल, मग त्यांना काय शिक्षा करणार ? "

काशीबाई म्हणाल्या

," माधवा ,हे बघ ,ही वेळ कुणाला दूषण देण्याची नाही . बोल लावायची नाही ! तुझे बाबा गुरुजींना घ्यायला गेले आहेत तोवर तुम्ही त्या वाड्याच्या मालकाची चौकशी करा . त्याला झालेलं नुकसान सांगा . एकतर तू तरी तो अर्धवट पडलेला वाडा भुईसपाट कर म्हणावं नाहीतर आम्ही करतो ! " काशीबाई आता बिथरल्या होत्या .

दोन दिवसात प्रकरण इतकं विकोपाला जाईल असं त्यांना वाटलं नव्हतं . एक सुखी कुटुंब संकटात सापडलं होतं . आणि त्या सोबत आजूबाजूचा परिसर ही ! डॉ . .माधव आणि केशवराव त्या कामाला लागले .

टेलिफोन डिरेक्टरीतून गावातील चार पाच प्रॉपर्टी डिलरचे नंबर शोधले . त्यांना फोन लावले . एका डिलरकडे त्या वाड्याची माहिती मिळाली . डॉ. माधवने स्वतःची ओळख करून दिली . आणि वाड्याजवळ येऊन भेटायला सांगितलं . डीलर आनंदाने तयार झाला . त्याला इकडची काही कल्पना नव्हती .

डॉ. माधवने वेगळा डाव रचला . त्यांनी इन्स्पेक्टर चाफेकरला बोलावून घेतलं आणि या वाड्यात कुणी चोरून लपून राहात असल्याचा दावा केला . आणि ते पाहून रेवती घाबरली असा ही कांगावा केला . रेवतीचे रिपोर्ट्स ही दाखवले .

इन्स्पेक्टर चाफेकरला रिपोर्ट किती कळाले काय माहित ? पण त्यांना इतकं नक्की समजलं की काहीतरी बघून रेवती घाबरली . ते काही तरी काय असू शकतं याचा अंदाज त्यांना आला . त्यांनी एकच सांगितलं ,खरं काय ते सांगा . यांनी सर्व काही सांगितलं . अगदी काकू त्यामुळेच वारल्या ,ते ही ! आणि आता येथील लोकांचे प्राण संकटात आहेत ! हे ही !

" मग तुम्ही आता काय ठरवलंत ? "

" इन्स्पेक्टर साहेब ,मी त्या वाड्याच्या प्रॉपर्टी डीलर ला बोलावलं आहे . तो वाडा कुणाचा आहे ते समजेलंच . त्यांनी तो वाडा पाडला तर ठीक ,नाहीतर तो आपल्याला

पाडावा लागेल .

तिथली जागा साफ करावी लागेल . जेणेकरून काही अनिष्टकारी शक्ती तिथे असतील तर त्या नष्ट होतील .किंवा कमी तरी होतील . त्यानंतर याठिकाणी काही वेगळा प्रकार होत असेल तर थांबेल ! "

इन्स्पेक्टरला हा विषय किचकट वाटला .

" हे बघा , जी गोष्ट मला शक्य आहे , माझ्या आवाक्यात येते , मी तेवढं करू शकतो . बाकीचं तुम्ही बघा . राहिली गोष्ट जागेच्या मालकाची , तर ती त्याने पाडावी की नाही , विकावी की नाही हा त्याचा अधिकार आहे .

तुम्ही त्याला फार फार तर विनंती करू शकता ,अडचण सांगू शकता , आणि शक्यता सांगू शकता ! पण चुकून ही त्याला असं सांगू नका की तुमच्यापैकी कुणी तिथं गेलं होतं म्हणून !

नाहीतर तो तुमच्यावर दावा ठोकू शकतो ! तुम्ही सर्व सभ्य लोक आहात म्हणून काळजी वाटतेय ,बाकी काही नाही . बरं चला ,मी निघतो . पोस्ट मार्टम होईल ,रिपोर्ट काय येतो ते बघू !

नंतर पुढची कारवाई होईल ! कारण हा नैसर्गिक मृत्यू नाही . एकतर अपघाती आहे , नाहीतर घडवला गेला आहे ! तो ही हेतू पुरस्पर ! "

➤➤➤➤➤➤

[१०]

तितक्यात प्रॉपर्टी डीलर आला . यांनी मालकाचे डिटेल्स विचारले . तो सांगे ना .

" या जागेचे हक्क माझ्याकडेच आहेत . तुम्हाला व्यवहाराचं बोलायचं असेल तर माझ्याशी बोलावं लागेल . "

इन्स्पेक्टर ने विचारलं ," नाव काय तुमचं ? "

" मी किरण ,किरण लोहार ! "

" लोहार मला फक्त एक सांगा , जागेचे हक्क तुमच्याकडे आहेत की जबाबदारी ही

तुमच्याकडे आहे या जागेची ? "

लोहार गोंधळला ," म्हणजे ? मी समजलो नाही ? "

"लोहार साहेब, जागेचा हक्क तुमच्याकडे आहे मान्य आहे ,मग या जागेत काय चालतं काय नाही ,याची जबाबदारी तुमची की मालकाची ?"

लोहार ला कळेना ,काय बोलावं तो सरळ शरण आला .

" इन्स्पेक्टर साहेब , मला तुमच्या कायद्याच्या भाषेत अडकवू नका ! दोन पैसे मिळावेत म्हणून मी हे काम करतो . इथे काही दुसरे धंदे चालतात का ?"

"अहो ते आम्हाला कसं माहित असणार ? जर जागा तुमच्याकडे आहे तर तुम्ही काळजी घेतली पाहिजे ! लक्ष ठेवलं पाहिजे ! नाहीतर भुईसपाट करून टाका .

असंही कुणी ही तुम्हाला प्लॉटचे पैसे देईल ,या पडक्या वाड्याचे नाही ! सर्व छान साफ करा ,मोठा बोर्ड लावा तुमच्या नावाचा ! हक्क तुमच्याकडे आहे ना ? लोकं तुम्हालाच भेटतील . काय ? पटतंय का ? "

इन्स्पेक्टर चाफेकरची हुशारी वाखाणण्याजोगी होती . लोहार स्वप्न रंजनात रमला होता . त्याला आपल्या नावाचे होर्डिंग दिसू लागले ! ही युक्ती आपल्याला का सुचली नाही ? उलट दोन पैसे जास्त मिळतील !

त्याचा चेहेरा खुलला .

" इन्स्पेक्टर साहेब मी लवकरात लवकर हे काम सुरु करतो . "

" अहं ! लवकरात लवकर नाही आजच ! आजच हे काम पूर्ण संपलं पाहिजे . तसंही काही फार काम नाही . बराचसा भाग आधीच कोसळला आहे . कसं करायचं ते तुम्ही ठरवा .

काही मदत लागली तर मला सांगा . पण आज झालं तरच ! उद्या मी तुमच्या जागेविरुद्ध येणाऱ्या तक्रारींवर ऍक्शन घेतली तर बोलू नका . "

लोहार ला त्या फंद्यात पडायचं नव्हतं . त्याची अचानक ट्यूब पेटली .

" मला कुणी फोन केला होता ?"

"मी ! मी डॉ. माधव शास्त्री . मला ही जागा घ्यायची होती . पण चौकशी केल्यावर कळालं की न घेतलेली बरी ! त्यामुळे बेत रद्द केला ! सॉरी ,तुम्हाला त्रास दिला ! "

" अहो नाही साहेब ! जागा चांगली आहे ! लोकं काहीही बोलतात ! "

" अहो बोलायचं सोडा ! इथे एक आजी राहात होत्या ,त्या रात्री वारल्यात ! आजूबाजूला

सर्व सभ्य लोक राहतात . कुणीतरी रात्री त्या वाड्यातून इकडे आलं आणि आजोबा घाबरवून मारलं ,असं लोकांचं म्हणणं आहे ! शिवाय रात्री अपरात्री गडबड गोंधळ सुरु असतो म्हणे . " डॉ. माधव बोलत राहिले .

"आओ साहेब ,ते सर्व जाऊ द्या .तुम्ही तुमचं बजेट सांगा . मी बघतो कसं करायचं ते !'

" नाई हो ! अजून जागेचं नाव ही घेतलं नाही . जागा नीट पाहिली ही नाहीतर हा गोंधळ , उद्या काही कमी जास्त झालं तर कोण जबाबदार ?"

" हां ,तुम्ही जागा प्लेन केली ,आम्हाला अंदाज आला , आमच्या कामासाठी योग्य वाटली तर आम्ही विचार करू . तूर्तास नाही ! चला निघतो मी ! " इतकं बोलून डॉक्टर जायला निघाले .

" पण तुम्हाला जागेचे डिटेल्स देतो मी ,तुम्हाला कळेलच त्यावरून ! त्यासाठी वाडा पडायची काय गरज आहे ? "

" नका पाडू ! तुमची इच्छा ! आणि ही जागा घ्यायची की नाही माझी इच्छा ! मला काय याच्यापेक्षा चांगली जागा मिळेल ! " एवढं बोलून डॉक्टर जायला निघाले .

" साहेब एक मिनिट ,मी तुम्हाला आज जागा मोकळी करून देतो . वाटल्यास आता ही पाहून घ्या . तुम्हाला अंदाज येईलच ! "

" नाही हो लोहार ! तुमच्या दोन पैश्याच्या फायद्यासाठी मी कशाला जीव धोक्यात घालू ? जाऊ द्या मी या जागेचा विषय घ्यायचा नाही असं ठरवलंय ! "

" साहेब एक काम करा . मला एक दोन दिवस वेळ द्या . मग जागा बघा आणि निर्णय घ्या . मग तर झालं ?"

" पण तुम्ही एका दिवसात कसं करणार ? बरं ,तो खर्च आणि माझा काहीही संबंध नाही , उद्या माझ्या गळ्यात मारू नका . मला योग्य वाटलं तरच मी जागा घेईन , ते ही योग्य भावात ! "

" साहेब ,मी लगेच काम सुरु करतो . मग तर झालं ? इन्स्पेक्टर साहेब चालेल ना ? "

" हो ,माझी काही मदत लागली तर सांगा. "

" हो , हो ! " एवढं बोलून लोहार निघून गेला .

" इन्स्पेक्टर साहेब ,थँक्स ! तुमच्याशिवाय हे शक्य झालं नसतं . "

" अहो त्यात काय ? माझं कामच आहे ते ! बरं , मी ही निघतो . "

इन्स्पेक्टर निघून गेले आणि केशवरावांचा निम्मा ताण कमी झाला .

" थॅक्स माधव !"

" अरे बाबा तुझीच कल्पना होती . मी काय केलं ? "

तेवढ्यात गंगाधर पंत आले . त्यांची स्वतःची कार होती . ते सोबत त्यांच्या गुरुजींना घेऊन आले होते .गुरुजींचं प्रसन्न व्यक्तिमत्व बघून सर्वांना धीर आला .

जो तो हात जोडून उभा राहिला . गुरुजींची स्नेहार्द्र नजर सर्वांवर फिरली .नंतर चाळी वर आणि वाड्याकडे गेली . त्यांची नजर पुन्हा चाळीवर स्थिरावली . पाऊले आपसूकच केशवरावांच्या घराकडे गेली .

" इथे कोण राहातं ? "

त्यांनी शांत स्वरात विचारलं .

" आम्ही राहतो ! " केशवराव पुढे आले .

" मग कुलूप का घातलंय ? "

" आम्ही काल बाहेर गेलो होतो , चावी शेजारील काकूंकडे असते नेहमी ! पण त्या काल रात्री वारल्या . चावी त्यांच्याकडेच होती . आम्ही सकाळी आलो . आता चावी शोधावी लागेल नाहीतर कुलूप तोडावे लागेल . "

गुरुजींची पावलं काकूंच्या घराकडे वळाली .

➢➢➢➢➢➢➢➢➢

[११]

घरात सीमाताई बसल्या होत्या . गुरुजींना पाहताच त्या उठल्या . आणि गुरुजींच्या चरणावर डोकं टेकवलं . आणि रडायला लागल्या .

"गुरुजी ,काही तरी करा हो ! हे सगळं माझ्यामुळे आणि माझ्या मुलीमुळे झालंय ! "

“उठ मुली ! रडू नकोस ! मुली ,हे जग असंच असतं ! असंच चालतं ! तू काय मी काय ? आपण फक्त निमित्त मात्र असतो . करता करविता तो आहे ईश्वर ! अवघ्या जगाचा स्वामी ! तोच सर्व काही करतो ! तेव्हा स्वतःला दोष देऊ नकोस ! तुझ्या मुलीला सांभाळ ! ती कुठेय ? "

सीमाताईंना पहिल्यांदा लक्षात आलं ,की रेवतीला आपण बराच वेळ झाला पाहिलं नाही ! त्यांना वाटलं बाहेर तिच्या बाबांजवळ असेल . पण गुरुजींच्या मागे केशवराव , डॉ. माधव , गंगाधर पंत काशीबाई आणि इतर चाळकरी आले . फक्त रेवती सोडून ! त्यांच्या काळजात धस्स झालं !

" ही गेली कुठे ? "....

पुन्हा शोधाशोध सुरु झाली .

" थांबा ! ती समोर आहे ! त्या वाड्यात ! तो वाडा .... "

गुरुजी तिकडे निघाले . त्यांच्यामागे सर्व जण ! ते पोहोचे पर्यंत लोहार तिथे पोहोचला होता .

" काय झालं ? " - लोहार

" यांची मुलगी सापडत नाहीए ! कदाचित इकडे आली असावी . गुरुजींचं म्हणणं आहे की या वाड्यात आलीय नकळतपणे ! अगदी तिच्याही नकळतपणे ! " एकाने सांगितलं .

लोहारला घाम फुटला . " म्हणजे ? "

" बाळा ,या वास्तूत पाशवी शक्तींचा वास आहे ! जो अनिष्टकारी आहे ! अगदी तुझ्यासाठी ही ! ही वास्तू शापित आहे ! "

" गुरुजी कृपा करून या प्रॉपर्टीबद्दल अफवा पसरवू नका ! तुमची मुलगी मी शोधून देतो . आणि या जागेला चारही बाजूने कंपाउंड घालतो ! म्हणजे कुणीही इकडे येणार नाही , चुकून ही येणार नाही ! "

"अरे बाबा अगोदर त्या मुलीचा शोध घे जा ! तिचा जीव धोक्यात आहे ! "

गुरुजी म्हणाले आणि त्या दिशेने निघाले . तुम्ही कुणीही येऊ नका ! मी बघतो ! "

गुरुजी सरळ मागील बाजूने गेले . समोर जिना दिसला . पायऱ्या चढून वर आले . दरवाजा लोटला . खिडकीखाली रेवती मान खाली घालून बसली होती .

" बाळा .... "

तिने मान वर केली आणि भयंकर आवाजात म्हणाली ,

" तू का आलास इथे ? निघ इथून ! "

गुरुजी तिच्या जवळ गेले . रेवतीच्या डोक्यावरून हात फिरवला आणि काही मंत्र म्हटला . तशी रेवतीने मान टाकली . गुरुजींनी तिला प्रेमाने उचलून घेतली . खाली घेऊन आले तसा लोहार धावत आला .

" गुरुजी कुठे होती ? "

" वरच्या खोलीत ! "

रेवती बेशुद्ध झाली होती .

केशवराव पुढे आले आणि रेवतीला गुरुजींकडून घेतलं .

" गंगाधर , माझं ऐकशील ? "

" काय गुरुजी ? "

" अरे या मुलीला सरळ तुझ्या घरी घेऊन जा . काही दिवस तुझ्याकडेच ठेव ! हिच्या जीवाला धोका आहे ! आणि हिच्यामुळे इतरांच्या ही ! माध्यम म्हणून हिचा वापर केला जातोय ? तुझ्या घरी सांभाळू शकशील ? "

" हो गुरुजी ! हे कुटुंब काल रात्री माझ्याकडेच होतं ! आणि रात्री हिनेच सांगितलं की कुलकर्णी आजी देवाघरी गेल्या म्हणून ! "

" हो ,पण तेव्हा तिचा वापर माध्यम म्हणून झाला नव्हता . ती तिच्या अतींद्रिय शक्तीने सांगत होती ! पण आता परिस्थिती बदलली आहे तू ठरव .

नाहीतर हिला मला आश्रमात न्यावं लागेल . पण ही लाडात वाढलेली पोर , तिथलं वातावरण झेपलं पाहिजे ! "

“नाही नाही गुरुजी , मी तुमच्या शब्दाबाहेर नाही ! माधव घे तिला तिचा इलाज कर आणि आपल्या घरी घेऊन जा ! "

" गंगाधर सध्या तरी तिला झोपलेली राहू दे ! मीच तिला मंत्र सामर्थ्याने झोपवली आहे . जितका वेळ झोपेल तितका वेळ सुरक्षित राहील ! काळीज करू नकोस ! तिला काही झालेलं नाहीं ! पण इतरांच्या सुरक्षिततेसाठी हे गरजेचं होतं ! "

केशवरावांच्या डोळ्यात असु दाटून आले . ' एवढीशी पोर ,काय काय सहन करतेय ! आणि आपण हिला दूर लोटली ? '

माधवनी कार काढली ,

" केशव तिला घेऊन मागेच बस ! "

" अरे पण .... "

" अरे बस ... जास्त विचार करू नकोस ! "

केशवराव मागे बसले रेवतीला धरून ,काही वेळात माधवच्या घरी पोहोचले . रेवतीला घरात झोपवून स्नेहल ला तिच्यावर लक्ष ठेवायला सांगितलं. पुन्हा इकडे परतले .

" माधवा ,मला वाटतं तू इकडे वेळ वाया घालवू नकोस . वाटल्यास हॉस्पिटलला जा , नाहीतर घरी जाऊन आराम कर ! "

" बरं , आई बाबांना ,गुरुजींना ,वहिनींना भेटतो आणि जातो . बरं ,वहिनींना घेऊ जाऊ का मी ? "

" बघ विचारून ,येते का ? "

"अरे रेवती जर उठून बसली तर वहिनी तिथे असाव्यात म्हणून म्हटलं .

" माधवा माझं काही म्हणणं नाही . ती येते का बघ . "

डॉ. माधव सर्वांना भेटले . सीमाताईंना त्यांचं ऐकावंच लागलं . काकू तर आता गेल्या होत्या ! जे लोक आहेत त्यांचं मन सांभाळणं गरजेचं होतं . त्यांनी विरोध केला नाही . त्या डॉ. माधव सोबत गेल्या .

काकूंच्या घरात केशवरावांच्या घराची चावी मिळाली . पण आपलंच घर उघडण्याची त्यांचीच इच्छा ही नव्हती आणि हिंमत ही !

"काय झालं केशव ? " गुरुजींनी विचारलं .

केशवरावांनी आदल्या दिवशी घडलेला प्रसंग सांगितला .

" केशव , उघड ! मी आहे ! "

" माझ्या मागे कुणी येऊ नका . मी एकटाच आत जाईन ! " केशवरावांनी कुलूप उघडलं आणि गुरुजींनी आत जाऊन दार लावून घेतलं .

➢➢➢➢➢➢➢➢➢

[१२]

गंगाधर पंतांनी केशवरावाना शांत केलं . "केशवा ,ती व्यक्ती सामान्य नाही ! काळजी करू नकोस !

काही वेळाने गुरुजींनी दरवाजा उघडला . प्रसन्न चित्ताने बाहेर आले . " या आत या ! आता हे घर सुरक्षित आहे ! "

केशवरावांना आनंद झाला . त्यांनी गुरुजींचा पदस्पर्श केला .

इकडे लोहारने माणसं कामाला लावली होती . अत्याधुनिक सामग्री वापरून काम सुरु होतं .

" केशव ,त्या लोकांना जाऊन सांग ,जरा काळजीपूर्वक करा म्हणावं आणि ती जिन्याकडची वरची बाजू अगोदर पाडा म्हणावं . सावधगिरीने ! काहीही होऊ शकतं ! "

केशवराव तिकडे गेले आणि त्यांना काही सूचना केल्या , लोहार ला एक कळत नव्हतं की या लोकांना एवढी काय पडलीय ?

पण त्याला डॉक्टरांना जागा दाखवायची होती आणि इतक्या लोकांचं लक्ष आहे म्हटल्यावर त्याचं काम सोपं होणार होतं . त्याने खरोखर कामात कसूर केली नाही . युद्धपातळीवर वाडा जमीनदोस्त केली तोवर संध्याकाळ झाली .

आता पडलेला ढीग उचलायचा आणि लाकडं बाजूला काढायची ,हेच काम सुरु होतं . रात्र वाढत गेली . बरंचसं काम उरकलं होतं . तसं लोहार ने काम बंद केलं .

" चला ,बाकीचं उद्या पाहू ! "

सर्वांना एकच आश्चर्य होतं की गुरुजी इथे इतका वेळ का थांबले आहेत ? ते थांबल्यामुळे गंगाधर पंतांना हालता येत नव्हतं . व काशीबाईंनाही ! बरं विचारणार कसं ? कारण गुरुजी तर विनाकारण थांबणार नाहीत .

" गंगाधर ,तुम्ही समजता तसा हा वाडा वरवर नाही ! "

"म्हणजे ?"

"अरे या वाड्याच्या आतून तळघर आहे ! त्या तळघरातूनच ती पाशवी शक्ती त्या वाड्यात पोहोचली आहे .कदाचित भुयार ही असावं ! मी इथे होतो म्हणून त्या पाशवी शक्ती अजून जाग्या झाल्या नाहीत ! त्या जर जागृत झाल्या तर किती बळी जातील

माहित नाही ! "

" गुरुजी ,थोडा आराम करा . तुम्हीही सकाळचं काही खाल्लेलं नाही ! मला वाटतं सगळ्यांनी थोडं खाऊन घ्यावं ,आपण माझ्या घरी जाऊया ! "

" नाही गंगाधर ! तुला कल्पना नाही ! आजची रात्र बहुधा काळ रात्र ठरणार आहे ! मला आज त्या तळघरात जावच लागेल ! काही करता आलं तर आजच ! उद्या कदाचित उशीर झालेला असेल ! "

" पण गुरुजी ,तळघरात जाणार कसं ? ते नेमकं कुठे आहे ,ते कसं कळणार ? "

"अरे जोवर तिथे जाणार नाही तोवर कसं कळणार ? "

गुरुजी गूढ स्वरात बोलले .

" त्या डिलरला बोलाव ! "

केशवराव डिलरला बोलवायला गेले ,तो आला . गुरुजींनी त्याला समजावून सांगितलं . त्याला दरदरून घाम फुटला . विश्वास बसेना ! पण विश्वास नाही ठेवला तर जीव जाईल ! पर्याय नव्हता . त्याने धाडसी निर्णय घेतला .

" गुरुजी मी तुमच्या सोबत राहिलो तर चालेल ? "

" हो ,मला काही अडचण नाही . पण तू या गोष्टींचा कधी सामना केला आहेस का ? "

" नाही गुरुजी ,पण बघावं तर लागेल की काय आहे ? की खरोखर कुणी रिकाम्या जागेचा फायदा घेतंय ? राहिला प्रश्न तळघराचा ,तर जागेच्या मालकांनी मला त्याबद्दल काही सांगितलं नाही. तरीही तुम्ही म्हणता तर खात्री करून घेऊ ! कदाचित त्यांनाही माहित नसावं ! "

" बरं मग तू असं कर ,जाऊन जेवण वगैरे करून ये ! मी इथेच आहे , फक्त जास्त उशीर करू नकोस . "

" ठीक ए गुरुजी ." लोहार निघून गेला .

" गुरुजी ,चला दोन घास तुम्हीही खाऊन घ्या . स्वयंपाक झालाय ! "

सर्वजण चाळीतील मोठ्या हॉल मध्ये जमले . दोन तीन गृहिणींनी मिळून स्वयंपाक केला होता . स्वयंपाक साधा होता पण रुचकर होता . काही वेळात जेवणं उरकली .

ज्यांना काही माहित होतं , त्यांचं जेवणात लक्ष लागत नव्हतं . काकूंचं प्रेत संध्याकाळी ताब्यात मिळालं होतं . त्यांचा अंत्यसंस्कार उरकण्यात आला होता .

मृत्यूचं कारण आत्यंतिक भीतीने हृदय विकाराचा झटका हेच होतं . सीमाताई

तात्पूरत्या येऊन पुन्हा निघून गेल्या होत्या . रेवती तिकडे काय करेल हे सांगणं कुणालाही शक्य नव्हतं . अगदी गुरुजींनाही !

उपाय फक्त एकच होता . रेवतीला जास्तीत जास्त वेळ झोपून ठेवणं .निदान जोपर्यंत त्या पाशवी शक्तींचा नाश होत नाही तोपर्यंत तरी !

लोहार खूप फास्ट निघाला . गुरुजींचं जेवण उरकण्या अगोदर तो येऊन हजर होता . गुरुजींना आणि सर्वांनाच त्याचं कौतुक वाटलं . गुरुजी प्रथम एकटे पुढे गेले . वाड्याच्या जागेत गेले .

आणि जमिनीवर बसले . काही वेळ डोळे मिटून मंत्र साधना केली . इकडे लोहार चलबिचल होत होता . त्याला कळेना ही व्यक्ती नेमकं काय करतेय . यात खरं किती आणि थोतांड किती ?

बराच वेळ गेला . बाकीचे चाळकरी कंटाळून निघून गेले . फक्त केशवराव ,गंगाधरपंत ,काशीबाई ,लोहार इतकेच मागे राहिले .

काही वेळात सर्वत्र सामसूम पसरली .. गुरुजींनी लोहारला खूण केली . जवळ बोलावलं ,त्याला हळुवार आवाजात काही समजावून सांगितलं . इतरांना ऐकू जाणार नाही याची काळजी घेतली .

गुरुजींनी केशव ला जवळ बोलावलं .

" केशव ,तुम्ही सगळे जा आता , कुणीही इथे थांबू नका . तुझ्या घरी जा आणि आम्ही परत यायची वाट बघा . " " पण गुरुजी ?"

" केशवा ,वेळ घालवू नकोस . जा निघा ! "

तिघांचा नाईलाज झाला . तिघेही गेले आणि लोहार वाड्याच्या पडलेल्या भागात .

वाड्याचा मध्यभाग मोकळा होता .जो काही ढीग होता तो चारी बाजूला होता . परीक्षा होती ती लोहारच्या विश्वासाची . गुरुजींनी त्याला एक वस्तू दिली होती . ती दिशा दर्शकासारखं काम करत होती .

आणि त्या वस्तूने आपलं काम केलं . एका जागी जाऊन ती वस्तू अचानक प्रकाशमान झाली . फक्त काही क्षण ! आणि प्रकाश पुन्हा विलुप्त झाला .

लोहार तयार होताच . त्याने पटकन खाली वाकून तिथे मार्किंग केली . तोवर गुरुजी त्याच्यापर्यंत पोहोचले होते . लोहार कुदळ घेऊन खणायला लागला . तसं गुरुजींनी अडवलं .

" अरे थांब ,गडबड करशील . ही जागा हाताने साफ करावी लागेल . "

" ठीक ए गुरुजी ,तुम्ही राहू द्या मी करतो ! "

पण गुरुजी थांबले नाहीत . लोहारने ही विरोध केला नाही . दोघांनीही भराभर जागा साफ केली .

" गुरुजी ? हा काय प्रकार आहे ? " लोहारला जागा पाहून आश्चर्य वाटलं .

"अरे हा चकवा आहे आपल्याला तिथपर्यंत पोहोचू द्यायचं नाही . थांब दोन मिनिट ! "

गुरुजींनी हात पुढे केला . काहीतरी दाबलं गेलं आणि घरघरच्या आवाजाने मोठठं भगदाड खाली उघडलं गेलं .

" चल ,चल लवकर .माझ्या मागे ये . वेळ कमी आहे ! रेवती एव्हाना उठली असेल , ती इथे यायला नको . नाहीतर अनर्थ व्हायचा ! "

गुरुजी आणि लोहार त्या तळघरात उतरू लागले . तसा घरघर करत मागे दरवाजा बंद झाला . तसा लोहार घाबरला .

" गुरुजी ? आता हो काय करायचं ? परत बाहेर कसे जाणार ? "

➢➢➢➢➢➢ ➢➢➢

[१३]

इकडे भुयाराचा दरवाजा उघडला आणि तिकडे रेवतीने डोळे उघडले . पण नजर ? नजर रेवतीची नव्हती ! ते जे काही होतं ,भयंकर क्रुद्ध झालं होतं ! रेवती उठून बसली . ती आणि सीमाताई एका बेडरूममध्ये झोपल्या होत्या . स्नेहल आणि बाळ दुसऱ्या बेडरूम मध्ये ! तिची चाहूल लागताच सीमाताई उठून बसल्या .

" रेवती ,बाळा उठलीस ? काही खातेस का ? "

त्यांनी मायेने विचारलं . पण ती त्यांची रेवती नव्हती . ती उठली सरळ दार उघडून बाहेर गेली . दार धाडकन बंद झालं . हे इतकं क्षणात घडलं की सीमाताईंना ही समजलं नाही . त्यांना कळेपर्यंत दरवाजा बंद झाला होता . त्या गडबडीने उठल्या . आणि दरवाजा ठोकू लागल्या .

तेवढ्यात त्यांना स्नेहालची किंकाळी ऐकू आली . आणि बाळाचं रडणं ऐकू आलं . तशा त्या प्रचंड घाबरल्या .काही अनिष्ट घडेल या जाणिवेने रडायला लागल्या आणि रेवतीला ,स्नेहल ला आवाज द्यायला लागल्या .

काही वेळाने स्नेहल ने दरवाजा उघडला . ती ही रडकुंडी आली होती .

“ काकू माझ्या बाळाला वाचवा हो ! "

" स्नेहल ? काय झालं ?"

" काकू ,रेवती बाळा ला घेऊन गेली . "

" काय ? कुठे ?"

" माहित नाही पण बाळाला घेऊन बाहेर गेली . "

स्नेहल ढसाढसा रडत होती .

" अगं मग तू तिला अडवलं का नाहीस ? "

" काकू कसं अडवणार ? "

" अगं एवढीशी पोर ती ! तिला अडवू शकली नाहीस ? "

" काकू ती रेवती नव्हतीच ,वाटतच नव्हती . तिने मला एका हाताने बाजूला ढकललं आणि बाळाला उचलून निघून ही गेली !"

" स्नेहल हे बघ रडू नकोस ,थोडा धीर धर . आपण करू काहीतरी ..... ,तू भाऊजींना फोन लाव . "

स्नेहल डोळे पुसत फोन जवळ गेली . नंबर डायल केला ... ' हॅलो माधव ?... "

"हा ... स्नेहल ... काय झालं ?"

" माधव ... रेवती आपल्या बाळाला घेऊन गेली ! "

माधवचा आवाज ऐकताच स्नेहलचा बांध फुटला होता .

" काय ? अगं काय बोलतेयस ? "

स्नेहलने भरभर सगळं सांगेतलं तसे माधवच्या अंगावर काटे आले .

" थांब मी आलोच . तू रडू नकोस ! "

" वहिनी कुठे आहेत ? "

" आहेत ना , त्यांना बेडरूममध्ये कोंडून रेवती आपल्या रूममध्ये आली आणि बाळाला घेऊन गेली ! " माधवच्या काळजात धस्स झालं .

' पण ही कुठे गेली असेल ? '

"माधव आता काय करायचं ? "

" मी निघालोच ! पाच मिनिटात पोहोचलो ."

➤➤➤➤➤➤➤➤➤

[१४]

इकडे केशवरावांच्या घरात सर्वांची तगमग सुरु होती . गुरुजी आणि लोहार ला जाऊन बराच वेळ झाला होता . गंगाधर पंत आता अस्वस्थ पणे येरझाऱ्या घालत होते .

" केशवा , याना बराच वेळ झाला रे ! नेमकं काय चाललंय या दोघांचं काय माहित ? "

" काका .मला वाटतं काही संकटात सापडले असतील ते ! आपण जाऊन बघायचं का ? "

" ठीक ए ! चल ! "

पण काकूंनी विरोध केला .

" अहो ,काही समजतं की नाही ? गुरुजींवर अविश्वास दाखवताय ? त्यांनी सांगितलं होतं ना ? मी येईपर्यंत वाट बघा ? "

" ते ठीक आहे गं ,पण तेव्हा त्यांना ही कल्पना नसेल की पुढे काय होणार आहे याची ! आणि मी त्यांच्यावर अविश्वास दाखवत नाहीए ,त्यांची काळजी वाटतेय म्हणून आम्ही

जातोय . चल केशवा ! ... "

" अहो पण .... " काशीबाई पुढे काही बोलू शकल्या नाहीत . कारण त्यांनाही काळजी वाटायला लागली होती . समजा गुरुजींना काही मदतीची गरज असली तर ?

" मी पण येते ! "

" अगं वेडी आहेस का ? गुरुजी आणि लोहार परत आले मग ? त्यांना कोणी समोर दिसायला नको का ? की भीती वाटतेय एकटं थांबायची ? "

" अहो , भीती कसली वाटणारे ? जा तुम्ही ! "

गंगाधर पंत आणि केशवराव निघाले . वाड्याच्या दिशेने !

" दार लावून घे गं ! "

" हो ! "

काशीबाईंनी दार बंद केलं आणि घरातील कॉटवर येऊन बसल्या . त्यांची नजर घड्याळावर गेली . बारा वाजून गेले होते . काशीबाईची धडधड वाढली !

आपण एकट्या आहोत ही भावना अचानक बळावली . पटकन दार उघडून बाहेर जावं असं त्यांना वाटलं !

' पण गुरुजी तर म्हणाले होते की हे घर सुरक्षित आहे ? मग आपल्याला असं अस्वस्थ का वाटतंय ? '

.....आपल्या मागे कुणी आहे ही जाणीव भयानक होती ! वळून बघायची त्यांची हिंमत नव्हती . त्यांची संपूर्ण काया थरथरायला लागली .

" घाबरलीस ?"

आवाज ओळखीचा होता पण कोणाचा ते लक्षात येत नव्हतं .

" मी पण घाबरले होते पण मलाही तिने सोडलं नाही ! आता तिने मला पाठवलंय तुला स्टॅच्यू करायला ! "

" रेवती ? "

त्यांनी झटकन वळून बघितलं .

आवाजाला न शोभणारा देह मागे उभा होता ! देह कसला ? देह सदृश्य काहीतरी होतं ! जे हाताच्या अंतरावर उभं होतं . उभं होतं ,की तरंगत होतं ? की हालत होतं ?

केस मोकळे ! मोठ्ठाले डोळे आणि नऊ वारी लुगडं !

काशीबाईंना आठवेना ,या बाईला कुठे पाहिलंय ? पण त्यांनी अंदाज बांधला आणि त्यांच्या पायाखालची जमीन सरकली .

" कुलकर्णी काकू ? "

' पण या तर .... ' पुढचं बोलायला काशीबाईंची जीभ धजली नाही .

रेवतीचा आवाज ऐकू आला . " स्टॅच्यू .... ! "

आणि ... काही क्षणात काशीबाईंचे शरीर जागच्या जागी थिजले .

' नाही ! मी हे होऊ देणार नाही ! गुरुजी म्हणाले होते की हे घर सुरक्षित आहे म्हणून ! '

पण हा फक्त विचार होता . त्यांच्या शरीरावर त्यांचा ताबा राहिला नव्हता . शरीर आता आकडायला लागलं होतं ! आपल्याला असं का होतंय ? हालता का येत नाहीए ? म्हणजे रेवती सांगत होती ते खरं होतं ? आपल्याला ही .....

पुन्हा आवाज आला . " आजी ... स्टॅच्यू ! "

समोर जो काही आकार होता तो क्षणाक्षणाला वेग वेगळे आकार घेत होता . कधी रेवती ,कधी कुलकर्णी काकू तर कधी गुरुजी ..काशीबाईंना धक्का बसला .

' गुरुजी ? याचा अर्थ गुरुजी सुद्धा ...? ' पुढचा विचार त्यांना करवेना !

' मग इतका वेळ सर्व जण कोणा सोबत वावरत होते ? ते कोण होते ? लोहार गेला ते कोणासोबत आणि हे दोघे आता गेले ते ? म्हणजे तिघांचा जीव धोक्यात आहे ? '

" नाही ,मी हे होऊ देणार नाही ! " त्यांनी बोलण्याचा प्रयत्न केला पण शब्द निघालेच नाहीत .

" काय करशील तू ? "

प्रचंड हास्याचा गडगडाट पूर्ण वातावरणात दुमदुमला . काशीबाईंना ते हास्य सहन झालं नाही ! त्यांच्या कानठळ्या बसल्या .

हृदयावरील प्रेशर वाढत गेलं . धडधड वाढायला लागली . तितक्यात दारावर थापा पडायला लागल्या . तेवढा धक्का पुरेसा होता काशीबाईंना ! त्या खाली कोसळल्या .

दारावर थापा पडत होत्या . हसण्याचा प्रचंड आवाज पूर्ण चाळीत दुमदुमत होता . आणि क्षणात शांतता पसरली ! हसण्याच्या आवाजाने चाळकरी जमा झाले होते ! ते दार ठोकत होते !

" केशव काय झालं ? "

पण दार उघडायला केशव नव्हता घरात ! आणि काशीबाई घरात असून ही दार उघडण्या पलीकडे गेल्या होत्या . पण अजून कुणी होतं ,जे मागे होतं ! त्याने दार उघडलं .

" केशवा ? काय झालं ? " समोर केशव ला पाहून चाळकरी विचारू लागले .

" कोण हसत होतं एवढ्या जोरात ? "

समोर उभा असलेला केशव थरथर कापत होता .

" अरे कुलकर्णी काकू .. कुलकर्णी काकू आल्या होत्या .. "

" काय ...? "

" हो ना .... त्यांचा अवतार पाहून यांनी जीव सोडला . मला तर कळत नाहीए ,मी जिवंत कसा ? बहुतेक तुम्ही अगदी वेळेवर आलात ! म्हणून असेल कदाचित . मी जातो ,माधवला फोन करतो . तुम्ही इथेच थांबा ! "

" अरे पण .... " पुढचं ऐकायला तिथे केशव थांबला नाही .

➤➤➤➤➤

[१५]

इकडे माधवने कार काढली . आणि तो तुफान वेगाने घराकडे निघाला . रात्रीची वेळ असल्याने रस्ता मोकळा होता . त्यांचं लक्ष समोर होतं ! काही अंतरावर त्याला

कुणीतरी पुढे चालताना दिसलं . कुणी लहान मुलगी .... अरे ही तर रेवती ... !

डॉ . ने रेवतीजवळ कार थांबवली . रेवती जवळ बाळ बघून त्याचा जीवात जीव आला . पण बाळ एवढं शांत कसं ? ते माधवला समजेना . पण आता विचार करण्याची वेळ नव्हती .

" रेवती ? बाळा कुठे चाललीस ? चल बस ,आपण घरी जाऊ ! "

रेवतीने एक क्षण डॉक्टर माधव कडे बघितलं . .ती नजर रेवतीची नव्हती . रेवती कार मध्ये बसली . माधवने कार काढली . त्याला काहीतरी अनैसर्गिक वाटत होतं .

रेवती आणि बाळ , दोघांच्या नजरा त्याच्यावर रोखल्या होत्या . माधवला समजेना ? हे असे का बघतायत ? आपलं बाळ तर जेमतेम सहा महिन्याचं आहे ! मग त्याची नजर अशी वेगळी का वाटतेय ?

" काका ,आजी गेली ! "

रेवती यांत्रिकपणे म्हणाली . तिच्याकडे न बघताच ते बोलले .

"हो बाळा ,जे झालं ते वाईट झालं ! तुझ्या त्या कुलकर्णी आजी चांगल्या होत्या . "

" नाही मी बाळाच्या आजीबद्दल बोलतेय . "

" काय ?.... म्हणजे ? ... " डॉ . माधवला धक्का बसला . त्याने करकचून ब्रेक मारला .

" हो ! बाळाच्या आजी पण गेल्या ! "

" रेवती ,काही काय बोलतेस ? " डॉ . कडाडले .

" आजी गेली ... बाळाची आजी गेली .." रेवती बोलतच राहिली . " मी बाळाला घेऊन तिकडेच जात होती . म्हटलं शेवटचं तरी आजीला बघेल ,भेटेल ! पण जाणार कसं ? आणि आता उशीर झाला ! बाळाला भेटण्यापूर्वीच आजी गेली ! "

" रेवती .... "

डॉ. ने खाड्कन रेवतीच्या मुस्काटात मारली .

" मला मारून काय होणार ? तू ही मरशील आणि तुझा बाप ही ! "

माधवला तिचं बोलणं सहन होईना . त्याने सुसाट कार काढली ,घराकडे पळवली . रेवती बोलत राहिली ... चाळीत काय झालं ते आणि पुढे काय होणार ते ,पण माधवला किती कळत होतं ? त्याचं किती लक्ष होतं कुणास ठाऊक ?

काही क्षणात कार दाराजवळ थांबली . स्नेहल आणि सीमाताई दारातच उभ्या होत्या

,त्याची वाट बघत .

" अरे माधव ...."

स्नेहल काही बोलणार इतक्यात तिचं लक्ष कार मधून उतरणाऱ्या रेवतीकडे गेलं . आणि बाळाकडे ....

" आरे .... " ती धावत पुढे आली आणि रेवतीकडून बाळाला हिसकावून घेतलं . पण तिला काहीतरी वेगळेपणा जाणवला .

हे बाळ तिचं असून तिला तिचं वाटत नव्हतं . त्याचा शांतपणा तिला सहन होत नव्हता . ती त्याचे पटापट मुके घेत होती . पण आपण बाळाचे ,आपल्या बाळाचे मुके घेतोय असं तिला वाटत नव्हतं . अर्थात तिला आता ते बाळ नकोसं झालं होतं !

माधव जड पावलांनी कार मधून उतरला .

" भावजी ? काय झालं ? " सीमाताईंनी विचारलं .

" वहिनी.... आई गेली ... ! "

" म्हणजे ? " सीमाताईंना स्नेहलला कळेना .

" म्हणजे ?"

" स्नेहल ,आई देवाघरी गेली ! ..."

" कुणी सांगितलं ?"

" हिने ..." माधव ने रेवतीकडे बोट दाखवलं .

तशी सिमा ला भोवळ आली .

" वहिनी .... डॉ. माधवने पुढे होऊन तिला आधार दिला .

" वहिनी ,सांभाळा स्वतःला .... "

असं म्हणून माधव ने सीमाताईंना आधार दिला .

स्नेहलला सहन झालं नाही . तिने डॉ . माधव आणि सीमेकडे रागाने बघितलं . ती बाळाला घेऊन रागाने पाय आपटत घरात गेली . डॉ. माधवला हे समजलं . तो ही तिच्या मागे तिला आवाज देत घरात गेला . स्नेहलला आवाज दिला ,

" स्नेहल अगं झालं तरी काय ? नीट सांगशील "

" काय सांगू मी ? " स्नेहल रागाने म्हणाली ," तुला काय काळजी पडलीय ,या लोकांची

कुणास ठाऊक ? यांच्यामुळे आपण अजून किती टेन्शन घ्यायचं ? यांच्या प्रॉब्लेम मुळे आपलं पूर्ण कुटुंब असुरक्षित झालंय ! कळत कसं नाही तुला ? तिथे आई कोणत्या परिस्थिती आहेत माहित नाही . आज आपल्या बाळावर संकट आलं आणि तू याला त्याला आधार देत बस . "

" स्नेहल ... " माधव नि स्नेहल वर हात उचलला .

" काय बरळतेस तू ? तुला तरी कळतंय का ? "

स्नेहल माधवच्या डोळ्यात पाहात म्हणाली . तिच्या डोळ्यात आसवानी गर्दी केली . " कळतंय ! सर्व कळतंय मला ! "

आणि ती रागाने रडत बेडरूम मध्ये गेली आणि धाडकन दार बंद केलं . माधव दारावर थाप मारत राहिला .

' स्नेहल ऐक तर खरं.... ? "

यांचं बोलणं सीमाताईंच्या कानावर पडत होतं . स्नेहल बोलली ते शब्दशः खरं होतं . तिच्या जागी कुणी ही असतं तर असाच विचार केला असता . आपल्यामुळे आणि आपल्या मुली मुळे दुसऱ्यांवर आपत्ती कोसळतेय .

बघता बघता दोन जीव गेले . याचा बंदोबस्त आपल्यालाच करावा लागेल . एक तर बंदोबस्त करू नाहीतर स्वतःला आणि रेवतीला संपवून टाकू . असा निर्धार करून सीमाताई रेवतीचा हात धरून ओढू लागल्या .

" चल ,चल इथून ! तुला बळीच घ्यायचाय ना ? माझा आणि माझ्या मुलीचा घे . मी तयार आहे . "

सीमाताई रेवतीला घेऊन तिथून निघून गेल्या . माधवला सीमाताईंची काळजी वाटत होती . तो बाहेर आला तर दोघींचा पत्ता नव्हता .

" अरे ? या दोघी कुठे गेल्या ? " माधव विचारात पडला . माधवला कळेना . या दोघीना शोधावं की स्नेहल ला समजवावं . तो तावातावाने घरात गेला .

" स्नेहल ! तुझ्या मुर्खपणामुळे वहिनी रेवतीला घेऊन निघून गेल्या . त्या दोघींचा जीव धोक्यात आहे . खास करून वहिनीचा !

तुझ्यामुळे त्या रेवतीसोबत एकट्या पडल्या . अगं देवाने डोकं दिलंय ,कधी तर वापर करत जा ! तिकडे आईचं काय झालंय ,कळायला मार्ग नाही . मी जातोय तिकडे ! तू बस रडत तुझ्या बाळाला घेऊन ! "

एवढं बोलून माधव कारची चावी घेऊन निघाला . दरवाजा जोरात ओढून घेतला .

कार काढली . आणि सुसाट वेगाने निघाला . कुठे हे बहुतेक त्याला ही सुचत नसावं . प्रथम आईला बघावं की सीमा वहिनींना ?....

➢➢➢➢➢➢➢

[१६]

इकडे दरवाजा धाडकन बंद झाला तशी स्नेहल भानावर आली .

'मी हे काय केलं ? मी एवढी स्वार्थी नक्कीच नाही ! मग मी अशी का वागले ? बाळामुळे ? बाळ - आपलं बाळ ! '

तिने बाळाकडे बघितलं तशी दचकली . ते बाळ तिच्या कडे रोखून बघत होतं . आणि त्याच्या मागे भुरकट आकृती तरंगत होती .

भुरकट ! धूसर ! नेमकं कळत नव्हतं की काय आहे ते ? पण असं काही होतं जे आतंकीत करणारं होतं . भयभीत करणारं होतं .

स्नेहलची बाळाला हात लावायची हिंमत झाली नाही . बाळाची नजर तिच्यावर रोखली होती . चेहेऱ्यावर विलक्षण हसू ! आणि ते रांगत रांगत स्नेहलकडे जायला लागलं . तशी स्नेहल कॉटवर मागे मागे सरकायला लागली . बाळाने हात पुढे केला .

हात हळूहळू स्नेहलकडे यायला लागला . स्नेहाला धोका जाणवला . तो इवलासा हात आपल्या दिशेने येतोय हे स्नेहलला समजलं . तितक्यात त्या धूसर आकृती कडून आवाज आला ," काकू स्टॅच्यू .... ! "

आणि स्नेहल हादरली ! जेव्हा तिने पहिल्यांदा हे सर्व ऐकलं होतं तेव्हा तिला तो पोरकटपणा वाटला होता . खोटं वाटलं होतं . पण ती आता त्याची सत्यता अनुभवत होती .

इथून पळून जावं ,निघून जावं असं वाटत असताना ही ती जागची हलू ही शकत नव्हती .साधे हातपाय ही हलवू शकत नव्हती .

बाळाचा हात पुढे होत राहिला ,बाळ पुढे येत राहिलं आणि पाठोपाठ शब्द ही !

" तू माझा वाडा घेणार ? माझी जागा घेणार ? मग मीच तुझी जागा घेतली तर ? "

स्नेहलला अर्थ कळाला नाही . पण आपल्या शरीरात काही विलक्षण बदल घडतोय ,हे तिला जाणवलं . तिच्या स्मृती हळूहळू पुसल्या जाऊ लागल्या . ती स्वतःची ओळख विसरली . निदान काही अंशी तरी . तिच्या जाणीवा पुसट होत होत नष्ट झाल्या .

आणि एका नवीन स्नेहलचा जन्म झाला . अर्थात तो स्नेहल नव्हतोच ! होतं ते फक्त स्नेहल चं शरीर !

कानावर शब्द आले ," ओव्हर ! "

तशी स्नेहल आळस देत उठली . जसं काही झालंच नव्हतं . तिने बाळाला उचललं . छातीशी लावलं आणि त्या घरात बघता बघता दोन अमानवी शक्तींचा वावर सुरु झाला . ....

➢➢➢➢➢➢➢➢

[१७]

इकडे गुरुजी आणि लोहार तळघरात उतरले तसा घरघर आवाज करत दरवाजा बंद झाला .

"गुरुजी , आता काय करायचं ? परत बाहेर कसं जाणार ? " गुरुजींच्या डोळ्यात विलक्षण चमक आली .

" का तू मालक आहेस ना या वाड्याचा ? मग तुला माहित नाही ? की इथे काय काय आहे ते ?"

लोहारला काय बोलावं कळेना ? त्याचा हातातील टॉर्च अवतीभवती अंधारात फिरत होता . बहुधा तळघर असावं . वर्षानुवर्षे बंद असलेलं . जुन्या वस्तुंनी भरलेलं ! कुबट वासाने जीव हैराण झाला . लोहार ने पॅन्टच्या खिशातुन रुमाल काढला . आणि नाकाला लावला .

" गुरुजी ? तुम्हाला वास नाही येत ?"

" नाही ! मला सवय आहे या वासाची ."

" म्हणजे ? " लोहारने विचारलं .

" काही नाही . चल . इथे एक मोठी पेटी असेल तिला मोठं कुलूप असेल ते उघड ! "

लोहारला समजेना ,हे नक्की काय चाललंय ? याना कसं माहित की इथे पेटी आहे आणि कुलूप कसं उघडणार ? चावी तर हवी .

" ही घे चावी . "

" चावी ? आणि तुमच्याकडे ? म्हणजे तुम्ही माझ्या परवानगी शिवाय इथे अगोदर येऊन गेलात ? "

" तुझा परवानगी ? लोहार मला एक सांग या वाड्याचा मालकी हक्क तुला कुणी दिला ?"

" कुणी दिला म्हणजे ? मालकाने ? " लोहार नाक दाबत विचित्र आवाजात बोलला .

" मालकाने ? पण मालक तर मी आहे ! " गुरुजी म्हणाले . " आणि माझ्या हयातीत मी कुणाला ही हक्क दिला नाही ! माझी मुलगी आजारपणात गेली . नंतर माझा अपघाती मृत्यू झाला . माझ्या पश्चात बायको एकटी पडली . तिला जळी स्थळी माझी मुलगी पार्वती दिसायला लागली . अर्थात ती पार्वती नव्हतीच . "

" म्हणजे ?" लोहारला काही समजेना .

" तो तुझा विषय नाही . सोड ! माझी बायको वारल्यानंतर वाडा ओस पडला . आणि तू पाळत ठेऊन होतासच ! तू डाव साधलास आणि एक दिवस कुलूप लावून मोकळा झालास ! पण मूर्खा ! कुलूप लावल्याने तू मालक होत नाहीस . ही जागा अजून ही माझीच आहे ! "

गुरुजींच्या बोलण्याचा अर्थ लोहारने वेगळाच काढला .

" म्हणजे ? तुम्ही मेलेले गुरुजी आहात आणि तरीही दुसऱ्याच्या जागेवर हक्क सांगताय ? काय गुरुजी ? शोभतं का ?"

" मूर्खा ,मी गुरुजी नाही . मी भैरवनाथ आहे ! या वाड्याचा मालक ! "

बदललेला आवाज आणि बदलणारं रूप बघून लोहारला दरदरून घाम फुटला . त्याचा हात नाकावरच होता . तो दाबला जाऊ लागला . जीव घाबरायला लागला . . आवाज दुमदुमला .

" ही जागा माझी आहे ! माझी जागा तू घेशील ? मग मीच तुझी जागा घेतली तर ? "

लोहाराचा श्वास गुदमरायला लागला . तो खाली कोसळला . हृदयाची स्पंदन वाढली . धडधड वाढत गेली ,वाढत गेली . आणि हळूहळू बंद झाली !

गुरुजींनी हात पुढे केला . तसा लोहाराच्या शरीरातील आत्मा गुरुजींच्या शरीरात समाविष्ट झाला .

" माझ्याच तळघरात येऊन माझ्याच वाड्यावर हक्क दाखवतोस ! ठीक आहे ! मग आता इथेच सड ! "

गुरुजी पुढे झाले . चावी ने कुलूप उघडलं . आतून काहीतरी वस्तू काढली . कुलूप बंद केलं . लोहाराच्या हातातील टॉर्च काढला . आणि त्याच्या प्रेताकडे तुच्छ कटाक्ष टाकत लाथ घातली .

" हरामखोर ,इथेच सड आता ! "

एवढं बोलून ते अंधारात टॉर्च मारत पुढे सरकले ! ....

➢➢➢➢➢➢➢➢➢

{ १८ }

इकडे केशवराव आणि गंगाधर पंत घराबाहेर पडले . रातकिड्यांची किरकिर आणि पानांची सळसळ या व्यतिरिक्त भयाण शांतता पसरली होती .या दोघांच्या पावलांचा आवाजा व्यतिरिक्त आवाज नव्हता .

" काका ?"

" काय रे केशवा ? "

" तुम्हाला ही शांतता विचित्र वाटत नाही ?"

" आपल्याला नेहमी गलबलाटात राहायची सवय असल्याने तसं वाटत असेल ! शिवाय रात्रीची वेळ ! "

" काका ,माझं ते म्हणणं नाही ! आज सकाळीच काकू वारल्यात ! माझ्या डोळ्यांसमोरून त्यांचा भयानक चेहेरा अजून जात नाही ! मग चाळकरी एवढ्या लवकर कसे विसरले असतील ?

मुख्यतः दीपक ? दीपक गुरव ,ज्याने काकूंच्या घरात उतरून दरवाजा उघडला होता . तो तर जागा असायला हवा होता . त्याचं ही दार बंद आहे . "

" मग तुझं काय मत आहे ? अगोदर त्याला बघावं का ? "

" नको ! गुरुजींना अगोदर शोधणं गरजेचं आहे ! "

" बरं ,एक काम कर ,आता मनात आलच आहे तर बघून ये . "

केशवरावांनी एक क्षण ही वाया न घालवता दीपक च्या घराकडे धाव घेतली . पण घराला बाहेरून कुलूप होतं . त्यांचा नाईलाज झाला . ते परत आले .

" काका , कमाल झाली . दीपक घरी नाहीए . न सांगता कुठे गेला असेल ? "

" अरे तुला सांगून जायला तो काही बांधील आहे का ? गेला असेल कुठे ,चल ! "

पण केशवरावांना काहीतरी खटकत होतं . त्यांना दीपक ची काळजी वाटत होती .

ते दोघे वाड्याच्या जागी आले . पाडलेले ढीग टाळत मध्यभागी पोहोचले . पण तिथे काहीही नव्हतं . कुणीही नव्हतं .

" केशवा ,अरे इथे तर कुणीही नाही . याचा अर्थ ते दोघे तळघरात गेले असतील ! "

" तळघरात ? पण इथे तर काहीच दिसत नाहीए . समजत नाहीये . आपण काय करायचं आता ? "

गंगाधर पंत आजूबाजूला पाहू लागले . त्यांनी निरखून बघितलं अंधारात ! त्यांना काही दिसलं असावं . ते डोळे बारीक करून पाहू लागले .

" केशवा ,मला असं वाटतंय की मी आता गुरुजींना बघितलं . "

" काय ? कुठे ?"

" त्या बाजूने झाडी आहे ना ? तो रस्ता कुठे जातो ?"

केशवराव गोंधळात पडले .

" काका ,त्या बाजूलाच तर रेवती सापडली . ती तिथेच घाबरली होती . आणि त्या झाडीतूनच रस्ता आपल्या चाळी कडे जातो ."

" याचा अर्थ गुरुजी घरी जातायेत तुझ्या ? ते ही एकटेच . मग लोहार कुठेय ?"

" काका ,त्याचं काम झालं असेल तर तो ही घरी गेला असेल . चला आपण ही जाऊ . "

" गुरुजी , अहो गुरुजी ..... "

केशवराव गुरुजींना आवाज द्यायला लागले . पण ते थांबले नाहीत .

" काका ,चला ,आपला आवाज त्याच्या पर्यंत पोहोचत नाहीये . "

" केशवा .. ,काय बोलतोयस कळतंय का ? अरे एवढी भीषण शांतता आहे की टाचणी पडली तरी आवाज येईल .आणि तू म्हणतोयस की आवाज पोहोचला नसेल ? नाही केशवा ,काही तरी गौड बंगाल आहे . एक तर ते गुरुजी नाहीत ! गुरुजी आपल्याला टाळणार नाहीत ! "

" आणि टाळत असतील तर ? "

केशवरावांनी शंका उपस्थित केली . उत्तर गंगाधर पंतांकडे ही नव्हतं .

" अहो गुरुजी ..... "

' आता थांबावंच लागेल ,हे आपला पिच्छा सोडणार नाहीत . "

जे काही होतं ,जे कुणी होतं ,ते थांबलं !

" काय रे ? कशाला ओरडताय ? " त्यांनी नाराजी व्यक्त केली .

" आणि तुम्ही दोघे इकडे काय करताय ? तिला एकटीला सोडून ? तिचा जीव धोक्यात घालून ? "

त्यांची शंका ऐकून तारांबळ उडाली .

" गुरुजी ,तुम्हीच सांगितलं ना की ते घर आता सुरक्षित होतं म्हणून ? "

" अरे म्हणून काय एकटं सोडायचं कुणाला ? मूर्ख आहात तुम्ही ! "

" गुरुजी ,लोहार कुठे गेला ? "

" काय माहित कुठे कलमडला ? तेव्हाच गेला तो परत आलाच नाही . "

गुरुजींची ही चिडचिड गंगाधर पंतांना अपेक्षित नव्हती . बऱ्याच वर्षांचे त्यांचे ऋणानुबंध होते . गुरुजींचा शांतपणा प्रचलित होता . आणि ते प्रसिद्ध होते . किती ही मोठे संकट आले तरी गुरुजी विचलित होत नसत .

" गुरुजी ,काय झालंय ? काही त्रास होतोय का ? "

" माझा त्रास तुला रे काय कळणार ? तुझी लायकी तरी आहे का ? बायकोला एकटं सोडून आलास संकटात ! अरे हिंमत होती तर मला शोधायला एकटं यायचं होतं . नाहीतर तिला ही सोबत आणायचंस . आता मेली बिली तर काय करशील ?"

" गुरुजी ..."

गंगाधर पंत कडाडले .

" काहो वाटतं का ? काहो हो बोलताय ? नाहो मला खात्रो झालोय .तुम्हो आमचे गुरुजो नाहीत ! सांगा ,कोण आहात तुम्ही ? " गंगाधर पंत ही आता जोरात बोलत होते .

समोरच्याला ही हेच अपेक्षित असावं . त्याने एक नजर दोघांवर फिरवली . आणि एक गडगडाटी हास्य आसमंतात दुमदुमलं . जे गुरुजींच्या व्यक्तिमत्वाला न शोभणारं होतं !

भीषण ! अगदी भीषण !

दोघांचा थरकाप उडाला . याच्या पेक्षा शांतता काय वाईट होती ? जी आपल्याला बोचत होती ?

केशवरावांनी गंगाधर पंतांचा हात धरला ," काका ,हे काहीतरी भयंकर आहे ! हे गुरुजी नाहीत . आपण उगीच यांच्या मार्गात आडवे आलो . "

केशवराव कुजबुजले ," आता काय करायचं ? तिकडे काकू एकट्या आहेत . हा म्हणतो संकटात आहेत ! चला ,आपण घरी जाऊ . "

" अरे पण हा आहे कोण ? हे नको कळायला ? आणि गुरुजी कुठेत ?"

" मी कोण ? अरे मी भैरवनाथ ! या जागेचा मालक ! "

पुन्हा गडगडाटी हास्य ,

" तुझे गुरुजी संपले .मी संपवले .तुझी बायकोही गेली आणि सून ही ! आता राहिला तुझा मुलगा ! त्याला कसं वाचवशील ते बघ . " पुन्हा गडगडाट हास्याचा .

" माझी जागा घ्यायला निघालात ना ? मग आधी किंमत तर मोजा ! "

गंगाधर पंतांचा राग अनावर झाला . ते समोरच्यावर धावून गेले . तसे क्षणार्धात दूर फेकले गेले .

" असला मूर्खपणा पुन्हा करू नकोस ! तुझ्या गुरूला संपवलंय मी ! तुझी लायकी ती काय ? तुम्हाला ही संपवलं असतं ! पण मला घाई नाही !

त्यापेक्षा महत्वाचं काम आहे ! पण याद राखा कुठे तोंड उघडलंत तर ? तुम्हाला संपवायला मला एक मिनिट ही लागणार नाही . चला निघा आता . "

गंगाधर पंत रागाने थरथरत होते . आणि केशवराव भीतीने !

" काका चला ... " केशवराव त्यांना ओढत म्हणाले .

" काका चला ...."

" नाही ,केशवा , मी याला सोडणार नाही ! याने माझ्या गुरुजींचं काय केलं , ते मला

समजलंच पाहिजे ! "

" काका ,आत्ता काकूंचा जीव वाचवणं जास्त महत्वाचं आहे . त्या संकटात आहेत ! आणि स्नेहलच्या ही जीवाला धोकाय ! "

" मुर्खा ,मी सांगितलं ते समजलं नाही वाटतं ? याची बायको ही मेली आणि सून ही ! मुलगा ही मरणाच्या दिशेने चाललाय ,त्याला कसं वाचवशील तो विचार कर !"

गंगाधर पंतांचं आता अवसान गळालं .

" पण मला एक समजत नाहीए ,तू आम्हाला का संपवतोएस ? मी तर तुला ओळखत ही नाही ! मी काही मदत करू शकतो का ? "

गंगाधर पंतांच्या प्रश्नाने केशवराव थक्क झाले .

" काका ,काय हे ? तो आपल्या जीवावर उठलाय आणि त्याची मदत कसली करताय ? तो म्हणतोय त्याने काकूंना आणि स्नेहलला संपवलंय ! चला बघू काय झालंय ते ? "

" नाही केशवा ,तू जा ! जर याचं म्हणणं खरं असेल तर मी ते सहन करू शकणार नाही . पण मरण्यापूर्वी याने आम्हाला का संपवलं हे जाणून घ्यायचा हक्क आहे माझा ! तू जा ,केशवा ! माझी काळजी करू नकोस ! जा ,निघ लवकर ! "

" नाही काका ! मी तुम्हाला सोडून जाणार नाही . "

" केशवा ,मूर्खपणा करू नकोस . जर काशी जिवंत असेल तर ती तिथे एकटी आहे . तिला सोबतीची जास्त गरज आहे . आणि समजा काही कमी जास्त झालं असेल तर माधव आणि स्नेहल ला कळव . "

" आणि काय सांगू त्यांना ? आईचं असं झालं म्हणून काकांना एकटं सोडलं . "

" केशवा ,त्यांचा ही जीव धोक्यात आहे हे त्यांना कळवायला नको का ? अरे आमचं झालंय जगून ! पण त्यांचं अजून आयुष्य पडलंय ! तुला कळत कसं नाही ? जा लवकर ! मी ही आलोच तुझ्या मागे ! "

केशवरावांना पर्याय नव्हता ,आणि विचार करायला वेळ ही नव्हता . असं ही आपण किती वेळ जिवंत राहू याची त्यांना शाश्वती नव्हती . सीमाताई आणि रेवतीची काही खबर नव्हती .

पण याच्या बोलण्यात त्याचा उल्लेख आला नव्हता याचा अर्थ अजून तरी त्या जिवंत होत्या ! तो ही याचा काही स्वार्थ असावा !

केशव रावांची परिस्थिती बिकट झाली . आनंद मानावा की दुःख ? त्यांना कळत नव्हतं . त्यांनी ऐकायचं ठरवलं .

" ठीक आहे काका , मी जातो ! पण तुम्हीही जास्त गुंतू नका ! "

एवढं बोलून केशव नी काढता पाय घेतला . एकीकडे आपलं कुटुंब वाचल्याचा आनंद तर दुसरीकडे माधवाचं कुटुंब संकटात सापडल्याचं दुःख होतं .

त्यांनी निर्धार केला ,काही झालं तरी याना वाचवायचं , मग भले ही आपले प्राण गेले तरी चालतील ! पण नेमकं काय करायचं त्यांना ही माहित नव्हतं . निदान सध्या तरी !

काही वेळात ते चाळीत पोहोचले . तिथलं वातावरण बघून त्यांना धडकी भरली ! याचा अर्थ भैरवनाथ ने खरोखर काही तरी केलंय . त्यांना बघताच चाळकरी त्यांच्या भोवती जमा झाले .

" का हो ? किती उशीर ? फोन करायला गेला होतात की बोलवायला ? " केशवरावांना कळेना .

" म्हणजे ?"

" अहो ,म्हणजे काय ? तुम्ही डॉ . माधवला फोन करायला गेला होतात ना ? मग केला का ?"

" नाही ! "

" का? "

" म्हणजे अजून तरी नाही ! "

" मग आता या काकूंचे अंत्यसंस्कार तुम्ही एकटे करणार का ? "

" काय ?"

" अहो काय ,काय ? असे भान हरपल्यासारखे काय करताय ? शास्त्री काकू वारल्या ! मग त्यांचे अंत्य संस्कार कोण करणार ? त्यांचा मुलगाच करेल ना ? की तुम्ही करणार ? "

" एक मिनिट ! हे बघा ,परिस्थिती खूप हाताबाहेर गेलीय ! तुम्ही समजताय तेवढं प्रकरण सोपं नाही . त्यात हा दीपक कुठे गेलाय कुणास ठाऊक ? "

केशव रावांना अचानक काही आठवलं .

" दीपक ला कुणी बघितलं का ? त्याला मी संध्याकाळ पासून बघितलंच नाही . "

" नाही हो ! कुलकर्णी काकूंच्या अंत्यसंस्कारानंतर तो दिसलाच नाही !

" कमाल ए ? "

केशवरावांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली .

'त्याचं ही काही बरं वाईट झालं नसेल ना ? ' ते स्वगत बोलल्यासारखे बोलले . कुणाला काही कळालं नाही .

" अं ? "

" नाही ,काही नाही ! नाडकर्णी काका ,मी तुम्हाला नंबर देतो .जरा माधवला फोन करता का ? "

नाही म्हणण्याचा प्रश्नच नव्हता . नाडकर्णी नंबर घेऊन फोन करायला गेले . आणि केशवराव हिंमत करून आपल्या घरात !

काशीबाईंचे प्रेत चाळकऱ्यांनी झाकून ठेवलं होतं . दोन तीन स्त्रिया प्रेता शेजारी बसल्या होत्या . केशवरावांनी वाकून प्रेताला नमस्कार केला .

" केशवा ," जोशीकाकू म्हणाल्या ," अरे ,सीमेलाही बोलावून घे .आहे कुठे ती ?" तितक्यात नाडकर्णी धावत आले ,

" केशवा .... काहीतरी भयंकर घोळ आहे ! "

" काका काय झालं ?"

" इकडे ये ?"

केशवराव त्यांच्या सोबत गेले . नाडकर्णींनी त्यांना हळूहळू काही सांगितलं . तशी केशवरावांनी पाचावर धारण बसली ! .....

➢➢➢➢➢➢➢➢

[१९]

माधवच्या घरून निघाल्यावर सीमाताई रेवतीला फरफटत घेऊन निघाल्या .

" चल , माझा आणि माझ्या मुलीचा बळी घे ! मी तयार आहे ! "

" अगं हो हो ! " रेवतीच्या तोंडून वेगळाच आवाज निघाला .

" एवढी काय घाई झाली तुला मरायची ? तुला बाई घाई फार असते ! त्या दिवशीही

अशीच घाई केलीस आमच्या वाड्यात यायची ! अगं ,आपण बोलावल्या शिवाय कुणाच्या घरी जात नाही ,आणि तू काहीही विचार न करता माझ्या वाड्यात घुसलीस ?

काय केलं होतं गं माझ्या पोरीने ? स्टॅच्यूच केलं होतं ना ? तुझ्या पोरीला ? मग एवढा आकांड तांडव करायची काय गरज होती ? मेली तर नव्हती ना ती ? पण नाही !

तुम्ही आज कालच्या मुली ना , तुम्हाला जरा ही दम निघत नाही ! प्रत्येक गोष्टीची घाई ! आमच्या वेळेस नव्हतं बाई असं ! नवऱ्याचं तोंड ही त्याची इच्छा असेल तर दिसायचं ! "

" पण तुम्ही आहात तरी कोण ? तुम्हाला काय हवंय ? " सीमाताई रडवेल्या स्वरात म्हणाल्या .

" मी कोण ? मला ओळखलं नाही ? कुलकर्णी काकूंनी सांगितली तीच मी ! यशोदा आणि ही माझी मुलगी - पार्वती ...."

बघता बघता तिथे एक धूसर आकृती प्रकट झाली ! लहान मुलीसारखी ! सीमाताई प्रचंड घाबरल्या . जागच्या जागी गोठल्या .

" काकू घाबरू नका ! मी तुम्हाला काही करणार नाही . पण मी रेवतीला न्यायला आलीय ! मला सोबत खेळायला कुणी नाही ना ! वाडा होता तो ही तुम्ही पाडलात . मग आम्ही राहायचं कुठे ? म्हणून आम्ही आता स्नेहल काकूंकडे राहायला आलोय ! मी हिला घेऊन जाऊ का ? सोबत खेळायला ?"

स्वर थंड होता पण धडकी भरवणारा होता ! आवाजात विश्वास होता !

" नाही ! मी काही झालं तरी रेवतीला सोडणार नाही ! "

"मग काय करणार ? "

समोरची धूसर आकृती हसत हसत बोलायला लागली . उत्तर सीमाताईंकडे ही नव्हतं .

" तू काहीही करू शकणार नाहीस . " तू आमचा वाडा उध्वस्त करायला कारणीभूत ठरलीस ! " रेवतीच्या तोंडून आवाज आला .

" तुला एकच पर्याय आहे ! एकतर आमचा वाडा पूर्ववत करून दे ,नाहीतर तुमची चाळ आम्हाला दे ! तोवर ही पोरगी आमच्या ताब्यात राहील ! एक लक्षात ठेव , तुझ्या नवऱ्याचा जीव धोक्यात आहे ! ही परिस्थिती तू निर्माण केलीस .

यातून मार्ग तुलाच काढावा लागेल ! तू हिला स्नेहलच्या घरी ठेवली होतीस ना ? मग ही तिथेच राहील इथून पुढे ! अगदी सुखरूप ! पण अट विसरू नकोस ! नाहीतर तुम्ही कुणीही जिवंत राहणार नाहीत ! जा आता वेळ घालवू नकोस . जा निघ ! "

एवढं बोलून रेवती शांत झाली . आणि स्नेहलच्या घराकडे जाऊ लागली . सीमाताई तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत राहिल्या . हतप्रभ झाल्यासारख्या ! त्या ही घराच्या दिशेने निघाल्या . निर्धाराने !

एक समाधान होतं ,निदान काही दिवस तरी रेवती सुरक्षित राहणार होती . .....

➢➢➢➢➢➢➢

[२०]

डॉ . माधव कार घेऊन निघाले ,ते थोडा गार वारा लागल्यावर शांत झाले . राग राग करून काही उपयोग नव्हता . जे काही करायचं ते डोकं शांत ठेऊन करावं लागेल .

'काय करावं ? कुठे जावं ?

चाळीत जावं की सीमा वहिनींना शोधायला ! आईचं खरंच काही बरं वाईट झालं असेल ?'

माधवच्या भावना अनावर झाल्या . स्वतःचाच राग आला . आपली आई तिथे मृत्युमुखी पडलीय आणि आपण इकडे बायको पोरांमध्ये गुंतून पडलोय ! "शेम ऑन यू ! "

अपराधीपणाची भावना अनावर झाली . आणि त्यांनी हंबरडा फोडला .

" आई ..... आई मी आलोच ! "

आणि कार भरधाव वेगाने पाळायला लागली .....

रात्रीच्या अंधारात सीमाताई झपाझप पावले टाकत होत्या . काही वेळापूर्वी निर्धाराने निघालेल्या सीमाताई आता थोड्या घाबरल्या होत्या .

रात्रीची ही निरव शांतता ! निर्मनुष्य रस्ते !

रस्त्यावर एक दोन कुत्री सोडली तर कुणीही नव्हतं . 'काही अघटित घडलं तर ? आपण अशा वातावरणात रेवतीला एकटं सोडलं ? आणि आपण ही एकट्या ? '

विचारानेच त्यांचं अंग शहारलं .

त्यांनी साडीचा पदर घट्ट गुंडाळला . आणि झपाझप पावलं टाकत जाऊ लागल्या . काही वेळाने त्यांना आपल्या मागे कुणी येत असल्याची चाहूल लागली .

मागे वळून बघायची हिंमत नव्हती . त्या देवाचं नाव घेत पुढे जाऊ लागल्या . काही क्षणात एक तीन चाकी सायकलवाला त्यांच्या जवळ पोहोचला . त्याने विचारलं ,

" माई ,कहाँ जाना है ?"

सीमाताईंनी उत्तर दिलं नाही .

" देखो बहन ,ऐसे रात के वक्त अकेले घुमना खतरे से खाली नाही है ! कहाँ जाना है मुझे बताओ ,मै छोड देता हूँ ! "

" लेकिन मेरे पास अभी पैसे नही है ! ठीक है घर पर दे देना ! "

सीमा ताईंना पर्याय नव्हता . त्यांनी विरोध केला नाही ! आपण केलं ते चुकीचं की बरोबर ,थोड्या वेळात कळणारच होतं .....

काही वेळात माधवची कार चाळीत येऊन थांबली . तसे केशवराव पुढे आले .

" माधवा .... " माधव लगबगीने केशवरावांच्या घराच्या दिशेने गेला .

" केशवा ,आई रे ? आई खरंच गेली ....? "

केशवरावांकडे शब्द नव्हते . त्यांनी माधवला कडकडून मिठी मारली . माधव लहान मुलासारखा रडायला लागला . थोडा वेळ लागला भावनांना आवार घालायला .

नंतर त्यांनी केशव च्या घरात प्रवेश केला . प्रेतावरील कापड बाजूला करताच आईचा भयाण चेहेरा माधवच्या नजरेस पडला .

" आई ..... " केशवने हाताने आईचे डोळे बंद केले .

" ही एवढी कशाला घाबरली ? " माधवने विचारलं . उत्तर केशव कडे नव्हतं .

तसे नाडकर्णी म्हणाले ,

" केशवा ... अरे सांग ना ! नेमकं काय झालं होतं ते ?"

" मला काय माहित काका ? मी आणि गंगाधर काका गुरुजींना बघायला गेलो होतो . गुरुजी आणि लोहारला बराच वेळ झाला म्हणून काकांना काळजी वाटत होती . काकू इथे एकट्याच होत्या . "

" केशवा अरे काय बोलतोस ? तूच तर आम्हाला सांगितलं की कुलकर्णी काकू आल्या होत्या म्हणून ? त्यांचा भयानक अवतार पाहून यांनी जीव सोडला म्हणून ? "

" माधवा ,प्रचंड गोंधळ आहे रे ! मी सांगतोय की मी तेव्हा काकांसोबत होतो वाड्यावर ! मग मी तेव्हा इथे कसा असेन ? काहीतरी भयंकर घडतंय ! तुला मला काही सांगायचंय ,एक मिनिट ! "

तितक्यात त्यांना चाहूल लागली . सर्वांनी त्या दिशेने बघितलं . सीमा ताई आल्या होत्या . केशवरावांचा जीव भांड्यात पडला . ते त्या दिशेने धावले .

" सीमे ? रेवती कुठेय ?"

" सांगते ! जरा पैसे देता का ?"

केशवरावांना परिस्थिती उमगली . त्यांनी सायकल वाल्याचे पैसे दिले .जास्तीचे पैसे देऊन आभार मानून त्याला रवाना केले .

तोवर सीमाताई त्यांच्या घरात गेल्या होत्या . त्यांनीही चादर काढून काशीबाईचा चेहेरा बघितला आणि पुन्हा झाकला . नमस्कार केला . त्यांचा थंडपणा पाहून सर्वांना नवल वाटलं ! त्या लगेच बाहेर आल्या .

" अहो ? काका कुठेत ? " हाच प्रश्न माधवला ही होता . अगोदर कुणी बोलावं ,सांगावं हेच त्यांना समजेना .

" हे बघा ,रेवती सुखरूप आहे तिची काळजी करू नका ! काका कुठेत ? "

केशवने सगळं थोडक्यात सांगितलं , माधव चे प्राण कंठाशी आले ! याचा अर्थ रेवती बरोबर सांगत होती . काय चूक होती आपली ? यांची मदत केली ही ?

स्नेहल तर हेच म्हणत होती ? आपण तिच्यावर डाफरलो आणि इकडे आलो . ती संकटात तर नसेल ? आणि आता बाबांना कसं वाचवायचं ?

माधव तडक वाड्याच्या दिशेने निघाला ,त्याला सीमाताईंनी अडवलं .

" भाऊजी ,एक मिनिट ! मला काही सांगायचंय ! " सीमाताईंनी एक क्षण ही वाया न घालवता जे घडलं ते सांगितलं . विश्वास ठेवायचा की नाही ? प्रश्नच नव्हता !

" भाऊजी काळजी करू नका ,काकांना काही होणार नाही ! आणि तसा ही आता दिवस उजाडेल ! तुमचं आता इथे असणं जास्त गरजेचं आहे . काका येतील परत ! त्यांच्यावर विश्वास ठेवा ! "

दोघांना सीमाताईंचं म्हणणं पटलं . काही वेळ वाट पाहण्याशीवाय पर्याय नव्हता . आणि कुणाला बघायला पाठवणं म्हणजे आजून एका मृत्यूला विनाकारण आमंत्रण ! बरं काही कमी जास्त झालं तर उत्तर कोण देणार ?.... शांत बसणं हाच पर्याय होता . निदान काही वेळा साठी तरी ....

आणि तसंच झालं . इकडे सूर्याची किरणं प्रकाशमान झाली आणि गंगाधरपंतांची चालीकडे येणारी छबी चाळकऱ्यांच्या दृष्टीस पडली .

" डॉ . अहो डॉ . तुमचे वडील आले . "

माधवने अत्यंत हर्षभराने तिकडे नजर टाकली . आणि वडिलांना बघताच तिकडे धाव घेतली . एकीकडे आई गेल्याचं दुःख होतं तर दुसरीकडे वडील समोर असल्याचा आनंद ! अखेर दुःखाने आनंदावर मात केली . आणि माधव ने हंबरडा फोडला .

" बाबा .... आई ... आई गेली हो ! " माधव वडिलांच्या गळ्यात पडून रडू लागला . त्याचं सांत्वन करता करता गंगाधर पंत स्वतः हतबल झाले होते . अजून याला घरचं काहीच माहित नाही ,स्नेहल चं काहीच माहित नाही वाटतं ? हा कसा काय सहन करेल ? त्यांनी वेगळाच पावित्रा घेतला .

" माधवा ,स्नेहलला नाही आणलंस ? "

" बाबा ,आपण आईला आपल्या घरी घेऊन जाऊ . अजून कुणाला कळवलं नाहीए . तुमचीच वाट बघत होतो . चला आता निघू ,मी ऍम्बुलन्सची व्यवस्था करतो .

माधवने आपल्या हॉस्पिटलला फोन करून ऍम्ब्युलन्स मागवली . दहा मिनिटात ऍम्ब्युलन्स पोहोचली . काशीबाईंचे प्रेत आत ठेवलं गेलं .

सीमाताई आणि केशवराव ऍम्ब्युलन्स मध्ये बसले . ऍम्ब्युलन्स मागे डॉ .माधव आणि गंगाधर पंत आपापली कार घेऊन निघाले . त्याशिवाय पर्याय नव्हता . काही लागलं तर गाडी हाताशी हवी ना !

आणि केशवरावांना गाडी येत नव्हती . चाळीत कुणी हक्काचं असं नव्हतं की जो गाडी व्यवस्थित नेईल . ....

थोड्याच वेळात तीन ही गाड्या डॉ . माधव च्या बंगल्यासमोर पोहोचल्या . माधवने कार पार्क केली आणि घाईघाईत उतरला ,बेल वाजवली . दार बंदच होतं गंगाधर पंत ही त्याच्याजवळ पोहोचले . त्यांच्या मनाला भीतीने ग्रासलं होतं . भैरव चं म्हणणं .....

दोन तीन दा बेल वाजवल्यावर दरवाजा उघडला गेला तसा त्यांचा जीव भांड्यात पडला . दरवाजा उघडणारी स्नेहल दरवाजा उघडून पुन्हा आपल्या बेडरूम मध्ये गेली आणि झोपून राहिली .

माधवच्या डोक्यात सणक गेली . त्याला आश्चर्य ही वाटलं . स्नेहल अशी वागणार नाही . हा नेमका काय प्रकार आहे ? त्यांनी गंगाधर पंतांकडे बघितलं . त्यांनी माधवला हाताने थोपटून शांत केलं .

आता काही बोलणं मूर्खपणा ठरणार होता . त्यांच्या पाठोपाठ सीमाताई आणि

केशवराव आले होते . त्यांना ही घरातील वातावरण अनैसर्गिक वाटत होतं . सीमाताईंची नजर रेवतीला शोधत होती . रेवती दिसली नाही . निदान हॉल मध्ये तरी नाही .

' ही घरी तरी आली की नाही ? आपण हिला रस्त्यात सोडून निघून गेलो होतो , तिच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन ! काही कमी जास्त झालं असेल तर ? '

" अहो .... रेवती दिसत नाही ! "

" म्हणजे ? तू तर म्हणाली होतीस की ती सुखरूप आहे ?"

" अहो असं काय करताय मी सगळं तर सांगितलं तुम्हाला ! मी घरात बघते . "

" थांब जरा ,इथे प्रसंग काय ,तुझं काय चाललंय ?"

सीमाताईंनाही रेवतीला शोधणं आततायीपणा वाटला . काशीबाईंचे प्रेत घरात आणलं गेलं .

नातेवाईकांना फोन केले गेले . तोवर घर आवरण्याच्या निमित्ताने सीमाताईंनी सर्व घर चेक केलं . एका खोलीत रेवती खाली जमिनीवरच झोपली होती . तिला पाहताच त्यांना गहिवरून आलं .

पोरीची काही चूक नसताना ही शिक्षा भोगतेय ! यातून मार्ग काढावाच लागेल . त्यांनी तिला अलगद उचललं . आणि एका बेडरूम मध्ये झोपवलं . आणि जाऊन स्नेहल उठवलं .

" स्नेहल ,अगं काय हे ? झोपतेस कसली ? काकू वारल्या ! तुला माहित नाही का ? "

स्नेहल ने तिच्याकडे पाहून स्मित केलं .

" मी स्नेहल नाही ! कालचं माझं बोलणं विसरलीस वाटतं ? मी हिच्या शरीराचा ताबा घेतलाय ! पण ते कुणाला कळणार नाही ! कारण माझ्या पार्वतीचा आत्मा त्या बाळात वसतोय !

तू आम्हाला आमचा वाडा परत दे ! नाहीतर हे कुटुंब जसं उध्वस्त झालं तसं तुझं कुटुंब ही उध्वस्त होईल ! "

" तुझी अट मला मान्य आहे . पण मला जरा वेळ तर देशील ? आणि भाऊजींना यातील काही माहित नाहीए ! नाहीतर ते जगू शकणार नाहीत !

निदान त्यांच्या तरी जीवाशी भावनांशी खेळू नकोस ! थोडी माणसांसारखी वाग ! अमानवीपणा करू नकोस ! मी तुझ्या पाय पडते . पदर पसरते . "

" ठीक ए . पण जास्त दिवस नाही ! " एवढं बोलून स्नेहल उठली . आणि डोळ्यात पाणी आणून हॉल मध्ये आली . स्नेहार्द नजरेने माधवकडे बघितलं . त्याच्याजवळ गेली . त्याचं सांत्वन केलं . त्याला कवटाळलं .

तो ही तिच्या गळ्यात पडून बराच वेळ रडत राहिला . गंगाधर पंतांना काही फरक पडणार नव्हता . त्यांची सहचारिणी कालवश झाली होती .

पण त्यांना ही एक प्रश्न पडला होता . भैरवनाथ म्हणाला की या दोघी वारल्या . मग ही जिवंत कशी ? काहीतरी खटकत होतं .पण काय ते समजत नव्हतं . पण आत्ता काही बोलणं ही उचित नव्हतं . त्यांना स्वतःचीच लाज वाटली आणि आश्चर्य वाटलं .

‘ आपण असे विचार करायला लागलो ? की आपला ही आत्मा आपल्याला सोडून गेलाय आणि भलत्याच ताकदीने आपली जागा घेतलीय ? आपली सून जिवंत बघून आपल्याला आनंद व्हायला हवा होता ? खेद कसला होतोय ? असूया कसली वाटतेय ?..... ‘

नातेवाईकांच्या गर्दीने बंगला गजबजला . आणि यथासांग अंत्यसंस्कार पार पडले . बघता बघता दिवस मावळला . आणि रात्रीच्या आशंकेने सीमाताईंना धडकी भरली . काही नातेवाईक थांबले . काही कामाचे निमित्त करून गेले . आपण थांबणे योग्य की अयोग्य ?

अशी सीमाताईंची द्विधा मनस्थिती झाली . शेवटी इथेच थांबण्याचा निर्णय घेतला . त्यांनी रेवतीवर नजर टाकली .

' ही अजून ही झोपून आहे ? काय झालंय काय हिला ? रात्री तर काही उपद्व्याप करणार नाही ना ?'

त्यांच्या विचारांनी त्याच दचकल्या .

'धोका नेमका कोणापासून आहे ? हिच्यापासून ,स्नेहल पासून की बाळा पासून ? आणि राहायचं म्हटलं तरी नेमकं काय करायचं ? जागं राहायचं ? पण किती वेळ ? आणि जागं राहून करायचं काय ?

काही .... कळत नव्हतं . पूर्ण अंधार ..... फक्त अंधार ! भविष्याचा ....

➢➢➢➢➢➢

[२१]

काशीबाईंची एक बहीण आली होती .

दुर्गाबाई ! दोन बहिणी ,दोन टोकं !

काशीबाई मनमिळावू होत्या .चार लोकांशी प्रेमाने बोलणाऱ्या होत्या .आपुलकीने वागणाऱ्या !

पण दुर्गाबाई ? एकदम कजाग ! कुजकट बोलणं ,भेदक नजर ,काळजाचा वेध घेणारी ,धडकी भरवणारी ,एकटक पाहणारी !

आता ही त्या सीमाताईंवर लक्ष ठेऊन होत्या . एकटक बघत .आल्यानंतर ओळख झालीच होती . पण सीमाताईंचं इथे थांबणं त्यांना रुचलं नव्हतं .इतरही दोन चार पाहुणे होते .पण कुणी एवढं लक्ष दिलं नाही .

" काय गं सीमे ? काय झालं ? " त्यांच्या बोलण्याने सीमाताई दचकल्या . " अं ... काही नाही ! "

" अगं एवढं घाबरायला काय झालं ? " दुर्गाबाईंच्या स्वरात जरब होती आणि काळजीही ! ती सीमाताईंच्या काळजाला भिडली . सीमाताईंचे डोळे पाणावले .

" काकू ,काहीच बरोबर नाहीए हो ! "

आणि .. सीमाताई त्यांच्याजवळ जाऊन रडायला लागल्या . " अगं काय झालं ,सांगशील की नाही ? "

सीमाताईंनी स्वतःला सावरलं . आणि पटकन आपले डोळे पुसले . ही वेळ योग्य नाही . चार लोक बघतायत आपल्या कडे !

" काकू ,आपण नंतर बोलायचं का ? की बाहेर जाऊन बोलूया ?"

" हे बघ माणसांची जेवणं उरकलीत .आपण दोन चार बायका आहोत ,तर दोन घास खाऊ मग सांग चालेल ? हो ? "

स्नेहलने बायकांना वाढून दिलं , तिची जेवायची इच्छा नाही असं म्हणाली . आग्रह करणार कुणी नव्हतं ! आणि सीमाताई आग्रह करणार नव्हत्या ! त्यांना नेमक कळत नव्हतं की दुर्गाबाईंना काय सांगावं ?

काय सांगू नये ? बरं सांगूनही ही बाई काय करेल ? काही करू शकेल की नाही हे सुद्धा समजत नव्हतं ! त्यांना स्वतःचाच राग आला , उतावीळपणाचा , प्रत्येक गोष्टीत घाई ! पण आता पर्याय नव्हता !

जेवणं झाली, आवरासावर झाली . दोघी कुणाच्याही नकळत गच्चीवर आल्या. निदान सीमाताईंना तरी असं वाटलं होतं की आपल्याकडे कुणाचं लक्ष नाही म्हणून !

पण असंख्य नजरा त्यांच्यावर नजर ठेवून होत्या !

" हा सीमे , बोल ! काय म्हणतेस ? "

सीमाताई जसं जसं सुचेल , समजेल तसं बोलायला लागल्या ! तेही हळू आवाजामध्ये ! त्यांचं बोलणं ऐकून दुर्गाबाईंच्या घशाला कोरड पडली !

" सीमे , पाणी आणते का ? "

" नाही ! म्हणजे पाणी देते मी तुम्हाला पण खाली चला , इथे एकट्या थांबू नका ! "

सीमाताईचं म्हणणं दुर्गाबाईला पटलं !

दुर्गाबाई निघाल्याही ! सीमाताईंना आश्चर्य वाटलं !

" काकू ? तुम्ही काही बोलल्या नाहीत ? "

" कशाबद्दल ? "

" अहो मी तुम्हाला आता सांगितलं त्याबद्दल ! "

तशा दुर्गाबाई अशोभनीय हसल्या !

" वेडी आहेस तू सीमा ! तुझी पोर जरा घाबरली काय आणि तुम्ही लोकांनी बाऊ केला त्या गोष्टीचा ! जे काही झालं ते फक्त योगायोगाने ! मुख्य अडचण काय माहितीय का ? "

" काय ? "

सीमाताईंना धक्काच बसला.

" तुझ्या बोलण्यावरून असं वाटत की तुझं घर, तुमची चाळही जुनी असावी ! तुम्ही आजकालच्या मुली , तुम्हाला सगळं कसं झॅकपॅक लागतं ! पण नवऱ्याची तेवढी कमाई पाहिजे ना ! तुला सुद्धा नवीन घरात,बंगल्यात राहायची सुप्त इच्छा असेल , पण नवऱ्याला डायरेक्ट कसं सांगणार ? म्हणून मग त्याला असं गंडवायचं ! घाबरवायचं !

नवरे ही काय गं ? बैलच असतात ! बायका सांगता आणि हे नाचतात ! बायकोच्या तालावर ! आता हेच बघ ना, तुझं इथल्या इथे गावात घर असून तू इथे थांबलीस ! का ? कारण तुला हा बंगला, ही मोठी जागा तुझ्याही नकळतपणे आवडून गेली ! "

" काकू ! तुम्ही काहीही काय बोलताय ? "

" सीमे , खरं तेच बोलतेय ! माझी बहीण देवभोळी होती ! मी नाही हो ! मी तुला आल्यापासून बघतेय ,तुझी नजर घरभर फिरत असते ! काही तरी शोधात असते !

काय शोधतेस गं तू ? बरं तुझा नवरा असताना माधववर सारखो लक्ष ठेऊन असते ! त्याला त्याची बायको आहे ना ? "

" काकू , तोंड आवरा हं ! "

" नाहीतर काय करशील गं ? मलाही मारशील का ? काशीला मारल तसं ? "

" अहो मी का मारू त्यांना ? "

सीमाला अक्षरशः घाम फुटला होता .

" नाहीतर कोणी मारलं गं ? एवढ्या रात्री ती तुझ्या घरी काय करत होती ? तू मस्त राहतेस इथे पोरीला घेऊन, मस्त डाराडूर झोपली असशील ! माझी बहीण बिचारी ! तुम्हा लोकांच्या बोलण्यात फसली ! तुम्ही काय दाखवलं ते पाहून घाबरली !.... "

" काकू एक मिनिट ! हे सगळं तुम्हाला कुणी सांगितलं ? "

" अगं तुझा नवरा सगळ्यांना तेच सांगत होता ! भामटा मेला ! "

" काकू बस झालं तोंड आवरा ! "

" का गं , खरं बोललं तर मिरच्या लागतात ? मला सांग ! चाळ तुमची , अडचण तुमची मग तुम्ही मरा ना ! हे कुटुंब का संपवताय ? आणि तू काय म्हणालीस गं ? स्नेहल ही स्नेहल नाही ! ते बाळ, बाळ नाही म्हणून !

खबरदार माधवला काही असं सांगितलंस तर ! त्या बिचाऱ्याची काय चूक गं ? म्हणजे त्याला हे सर्व सांगायचं , त्याने मनाला लावून काही कमी जास्त केलं मग तुम्ही नवरा बायको मोकळे इथे फुकटात राहायला ! "

" काकू अहो तुम्हाला वेड लागलय का ? काहीही काय बोलताय " सीमाताई रडकुंडीला आल्या होत्या .

" काकू , मी खरं तेच सांगितलं आणि भाऊजींचा, काकांचा जीव धोक्यात आहे म्हणून तुम्हाला विनवणी केली ! की तुम्ही तरी काही करू शकाल म्हणून ! " सीमाताई रडवेल्या स्वरात म्हणाल्या .

" ती काहीही करणार नाही ..... करू शकणार नाही ! "

अंधारातून आवाज आला तशा दोघी दचकल्या आणि आवाजाच्या दिशेने बघू लागल्या ! अंधारातून एक व्यक्ती पुढे आली तसा दुर्गाबाईंच्या जीव भांड्यात पडला !

" स्नेहल तू होय ! ये गं बरं झालं आलीस ! ही सटवी बघ , तुझं घर हडप करायला निघालीय ! काहीही सांगतेय ! "

" नाही ! तो खर तेच बोलतेय ! मी स्नेहल नाही ! मी कोण आहे हे तुला हिने तुला सांगितलंय ! पण तुझा विश्वास बसत नाही ! ठीक आहे, आता नाही पण मेल्यावर नक्की बसेल ! " सीमाताई हात जोडू लागल्या.

"स्नेहल मी तुझ्या पाया पडते ! "

" सांगितलं ना मी स्नेहल नाही म्हणून ! "

" हो हो ! तुम्ही जे कुणी आहात , यांना मारू नका ! यांची काही चूक नाही ! त्या जे काही बोलल्या, त्या या कुटुंबावर असलेल्या प्रेमापायी बोलल्या ! "

" सीमा , मूर्ख आहेस तू ! हिचं प्रेम बिम काही नाही ! ही बारा गावचं पाणी प्यायलीय ! तू चुकीची व्यक्ती निवडलीस, मदती करता ! हिला सर्व सांगितलंस , थोडा तरी विचार करायचा !

तू हिला धड ओळखतही नाहीस ! ही आता हिच्या फायद्याकरिता काहीही करेल ! पण गाठ माझ्याशी आहे. आता हे घर माझं आहे ! माझं ! आणि माझ्या कुटुंबाशिवाय इथे कुणीही राहणार नाही ! .....

अहो sssss ! "

सीमाताई आणि दुर्गाबाई दोघीही प्रचंड घाबरल्या होत्या. दुर्गाबाईचा तर जीव कंठाशी आला होता !

' ही आवाज कुणाला देतेय ? माधवला ! बरं झालं तो तरी काही करेल ! आपला जीव वाचवेल ! '

पण झालं भलतंच !

समोर जी व्यक्ती अवतीर्ण झाली ती दोघींच्या परिचयाची नव्हती !

" काय गं यशोदे ? " - आवाज पुरुषी होता .

" ही म्हातारी आपला खेळ खंडोबा करेल ! हिला आजच निपटावी लागेल ! "

" जाऊ दे गं ! पाहू ना , काय करते ? जाऊ दे तिला ! आणि तसंही आपलं उद्दिष्ट वेगळं आहे ! आणि या दोघींना कुठे सर्व गोष्टी माहीत आहेत ? जो काही करणार होता, त्याला आपण केव्हाच संपवला ! "

सीमाताई अक्षरशः थरथरत होत्या ! त्यांना कळेना यांनी अजून कुणाला संपवलं ! त्यांना केशवरावांचं बोलणं आठवलं ! त्यांना तेव्हा नाही पण आता धक्का बसला !

' अरे बापरे ! आपण हे कसं विसरलो ? ज्यांनी गुरुजींना संपवलं , त्यांच्या पुढे

आपण काय आहोत ? याचा अर्थ आपण काहीच करू शकत नाही ! '

' देवा ! असा कसा तू निर्दयी ? एकदा तरी आमचा विचार करायचास ? याचा अर्थ चूक माझ्या मुलीची ही नाही आणि माझी सुद्धा नाही !

आपण नसतो पोहोचलो तरी हे आपल्यापर्यंत पोहोचलेच असते ! मग आता आपला वाली कोण ? की आपलं कुटुंब असंच संपणार ? '

" सीमे ssss ए सीमे ssss अगं वर आहेस का ? "

केशवरावांच्या आवाजाने सीमाताई दचकल्या आणि भानावर आल्या. त्यांनी मागचा पुढचा विचार न करता तिथून काढता पाय घेतला !

' आपण इथे थांबलो तर हे वर येतील आणि नसती आफत ओढवेल ! आपलं जे व्हायचं ते होवो !

" काकू चला इथून..... "

पण काकू सुन्न झाल्या होत्या ! त्या फक्त सीमाताईंना जाताना बघत होत्या ! आपण आता जगत नाही याची त्यांना खात्री पटली !

त्यांचा भूतकाळ झरझर डोळ्यांसमोरून जाऊ लागला ..... आपण केलेले पापकर्म.....त्याचंच हे फळ ! भोगावे तर लागेलच ! त्यांची मनाची तयारी झाली !

" घाबरू नकोस ! मी तुला एवढ्या लवकर मरू देणार नाही ! तू फक्त आम्हला मदत कर ! तू पण आमच्याच जातकुळातील आहेस ! जे आम्ही मेल्यानंतर करतोय , ते तू जिवंतपणी करून बसलीयेस ! आमची मदत कर आणि खुशाल जग तुझं पूर्ण आयुष्य !”

तोच पुरुषी आवाज गडगडला. तसा दुर्गाबाईचा धीर वाढला .

" पण माझा काय फायदा ? "

" फायदा ? आलीस आपल्या लायकीवर ! जिवंत सोडतोय हे काय कमी आहे का ? "

दुर्गाबाईंच्या एक गोष्ट लक्षात आली होती की , ' काही कारणास्तव हे आपल्याला मारत नाहीएत किंवा मारू शकत नाहीएत ! मग आपण कशाला घाबरायचं ? ' त्यांनी वेगळाच डाव टाकला .....

" ठीक आहे मग ! मारून टाका मला ! अशी ही मी आता किती जगणार ? दोन दिवसाने मरायचं ते आजच मरेल एवढंच ! खुशाल संपवा मला ! "

" काय पाहिजे तुला ? " - तोच पुरुषी आवाज.

" सांगेन ना , पण मला तुमची काहीच माहिती नाही ! मला काय करायचंय, तुम्हाला काय पाहिजे ते माहित नाही ! तुम्ही आतापर्यंत काय काय केलंय , पुढे काय करणार आहात ते अगोदर सांगा !

मग मला काय पाहिजे मी ते सांगेन ! आणि तुम्ही कुणा कुणाचं काय काय केलंय ते ही सांगा ! "

" हुशार आहेस ! काहीच न करता सगळी माहिती काढायचा प्रयत्न करतेस ! ठीक आहे ! पण एक लक्षात घे ! मी आमच्या बद्दलचा सर्व इतिहास तुला सांगतो, पण जेव्हा आमचा हेतू साध्य होईल तू ही मृत्युमुखी पडशील , यात शंका नाही ! “

दुर्गाबाई समजून चुकली. आपलं मरण निश्चित आहे. आज ना उद्या ! तिला आपला सर्व भूतकाळ क्षणार्धात दिसला !

आपण केलेले पापकर्म दिसले . जात जात का होईना , दोन लोकांचं भलं कसं करता येईल ते बघावं ! म्हणजे निदान मरताना तरी समाधान लाभेल .....

➢➢➢➢➢➢➢➢

[२२]

गुरुजी एक असाधारण व्यक्तिमत्व ! सन्यस्त वृत्ती ! संन्यासी कसा असावा याचं एक उत्तम उदाहरण ! त्यांचे भक्तगण आणि अनुयायी फारसे नव्हते . पण जे होते ते जीवा भावाचे .

त्यातीलच एक गंगाधर पंत आणि त्यांचे कुटुंब . इतर अनुयायांपेक्षा त्यांचा गंगाधर पंतांकडे विशेष ओढा होता . आणि हा काही एक दिवसाचा जिव्हाळा नव्हता . जवळजवळ तीस वर्षांपूर्वीचा .म्हणजे माधवच्या जन्मा अगोदरचा .

तो आजतागायत टिकून होता . गुरुजींना अनेक सिद्धी प्राप्त होत्या . त्यांची अध्यात्मिक बैठक चांगली होती . आणि मन उदार होतं .

त्यांच्या सान्निध्यात राहून काही सिद्धी गंगाधर पंतांना ही अवगत झाल्या होत्या . पण त्यांचा वापर अगदी योग्य वेळी करता येणं हेच खरं कसब होतं . आणि नुसतं करून पाहून चालणार नव्हतं नाहीतर सिद्धिंचे अनिष्ट परिणाम सुद्धा होऊ शकत होते .

असं ही आता गंगाधर पंतांना जगण्यात रस राहिला नव्हता . त्यांची सहचरणी अनंतात विलीन झाली होती . ते काहीही करू शकले नाहीत . आणि गुरुजी ?

गुरुजींसारखं व्यक्तिमत्व संपू शकतं हेच त्यांना पटलं नव्हतं . पचत नव्हतं . भैरवनाथ सारखा यकश्चित आत्मा गुरुजींना संपवू शकतो हेच गंगाधर पंतांना रुचत नव्हतं . मग ,गुरुजी गेले कुठे ? आणि हा भैरवनाथ ? तो म्हणतो की तो त्या वाड्याचा मालक पण त्याची आणि आपली काय दुश्मनी ?

हा नेमकं काय चाललंय ,याचा छडा लावणं गरजेचं होत. कोण सांगेल ?..... त्यांनी बराच विचार केला . आणि त्यांना उत्तर मिळालं !

समस्या तिथे समाधान !

पण तो का सांगेल ? एक तर त्याला सांगायला प्रवृत्त करायचं नाहीतर त्याला नेमकं काय हवंय ते समजून घ्यायचं . आणि मिळवून द्यायचं . पण त्या जागी लगेच जाणं शक्य नव्हतं .

घरी नातेवाईक आलेले . बोलण्या बोलण्यात विचारांची शृंखला सारखी तुटत होती . बरं सर्वांना सांगण्यासाखा हा प्रकार नव्हता . पण दुर्गाबाई ? तिचं काय करावं ?

ती आलेलं त्यांना खटकलं होतं पण नाईलाज होता . काशीबाईंची सक्खी बहीण म्हटल्यावर येणारच ! एक नंबरची कारस्थानी बाई ! हिच्यावर लक्ष ठेवणं गरजेचं आहे !

त्यांचं लक्ष सीमाताईंवर ही होतं . सीमाताईंची भिरभिरती नजर त्यांना अस्वथ करत होती . ही काहीतरी शोधतेय आणि आपल्यापासून लपवतेय .

आणि स्नेहल ? तिचं वागणं ही अनैसर्गिक आहे ! आणि आपला नातू स्नेहांश ? तो हि आपल्याकडे रोखून बघतो ! आपल्याला त्याची आता ओढ वाटत नाही .

काय कारण असेल ?

त्यांना भैरवनाथचं बोलणं आठवलं आणि जीवाचा थरकाप उडाला ! काळजाचं पाणी पाणी झालं ! हा ही जिवंत नाही ? की यांच्या अस्तित्वावर कुणाचं प्रभुत्व आहे ? जिवंत म्हणजे काय ? शरीरं तर स्नेहल आणि स्नेहांशचीच होती .

याचा अर्थ यांच्या अंतर्मनाचा ताबा काही अज्ञात शक्तींनी घेतलाय ?

हो याचीच शक्यता जास्त आहे ! आणि त्यांना नकळतपणे बरं वाटलं . निदान हे असे तरी जिवंत राहतील .

त्यांनी मनाचा निर्धार केला ! काही झालं तरी कुटुंब ,आपलं कुटुंब ,आपला वंश वाचलाच पाहिजे ! भले ही जीव गेला तरी बेहत्तर !

ते निघाले ! निर्धार करून निघाले ! पुन्हा त्या वाड्याच्या दिशेने .... जिथे भैरवनाथ भेटला होता त्या दिशेने ! गंगाधर पंतांना कल्पना नव्हती की ते ज्याच्या शोधात फिरत आहेत ते अस्तित्वच त्यांच्या घरापर्यंत पोहोचू शकतं !

..... ते वणवण भटकले पण उपयोग झाला नाही . शेवटी नाईलाजाने मध्यरात्री घरी परतले . त्यांचं लक्ष अनाहूतपणे गच्चीकडे गेलं .....

' ही ...? ही वर काय करतेय ? ते पण या वेळेस ?' वर दुर्गाबाई होत्या . कुणाशीतरी बोलत ....

'पण कोण असेल ? या वयात .. कुणाशी ... एकांतात बोलणं ..... काय .. चाललंय ?'

ही बाई पाताळयंत्री आहे ,हिच्यावर लक्ष ठेवणं गरजेचं आहे . दुर्लक्ष करून चालणार नाही . त्यांनी दारावरची बेल वाजवली .माधवने दार उघडलं .

" बाबा ... अहो कुठे गेला होतात ? एक शब्द कल्पना तर द्यायची ! आम्ही दोघे केव्हाचे शोधतोय ? " माधव च्या मागे केशव होताच .

" शहहहह ! " गंगाधर पंत त्यांना बाजूला सारून आत शिरले . आणि जिन्याने वर जाता जाता मागे वळून म्हणाले . " माधवा ..? वर कोण आहे दुर्गा सोबत ? "

" बाबा कोण असणार ? ते ही या वेळी ? सर्व जण झोपले आहेत . आम्हाला तुम्ही दिसला नाहीत म्हणून आम्ही जागे होतो . "

" माधवा ,चल ! या बाईचा काही भरवसा नाही . "

माधवला ही आपल्या मावशीबद्दल बरीच माहिती होती की ही बाई भयंकर उचापती करणारी आहे !

" केशव ,चल ! "

तिघे भराभर गच्चीवर पोहोचले . गच्चीवर अंधार होता आणि कोपऱ्यात पॅराफीट वॉल जवळ दुर्गाबाई उभ्या होत्या . त्यांच्या कडे पाहून वाटत होतं की त्या कुणाशी बोलत असाव्यात . पण समोर तर कुणी नव्हतं . मग ही कुणाशी बोलतेय ? अवास्तवाशी ?

" दुर्गे ...? काय चाललंय ....? " गंगाधर पंत कडाडले .

" अगं आजच तुझी बहीण वारली ना ? तू लगेच उद्योग सुरु केलेस ? काय करत होतीस ? "

दुर्गाबाई अगोदर दचकल्या . पण नंतर शांतपणे तिघांकडे बघून म्हणाल्या .

" बरं झालं तुम्ही आलात . मला प्रश्न पडला होता की तुम्हाला वर कसं बोलवायचं ? बाकीचे काय विचार करतील ?"

" हे माझ्या प्रश्नाचं उत्तर नाही ! तू इथे काय करतेस हे विचारलं मी ! "

दुर्गाबाई अगदी थंडपणे म्हणाल्या ,

" पंत ? भैरवनाथला ओळखता का ? "

गंगाधर पंत आश्चर्यचकित झाले . आणि केशवराव ही ! माधवला कळेना त्याने विचारलं ,

" कोण भैरवनाथ ...?"

" माधव ,थांब जरा ! " गंगाधर पंतांनी माधवला मधेच अडवलं आणि दुर्गाबाईला विचारलं ,

" तुझा आणि त्याचा काय संबंध ?"

" पंत , मी सगळं सांगते ,पण माझ्यावर विश्वास ठेवाल का ? "

" विश्वास ठेवायचा की नाही ते मी ठरवेन ! तुला काय बोलायचं ते पटकन बोल ! भैरवनाथचा आणि तुझा काय संबंध ? "

" माधव ,तू जा खाली . तू यात गुंतू नकोस . "

दुर्गाबाईंनी माधवला प्रेमाने सांगितलं . फक्त एक काळजी घे ,तुझ्या बायको पोरापासून दूर रहा . "

" मावशी ,अगं काय बोलतेस तू ? "

" बाबा ,काय झालंय ? काय चाललंय ? सांगाल का ? "

दुर्गाबाईंचा शांतपणा आणि हावभाव पाहून गंगाधर पंतांचा राग शांत झाला . हिला असं काही माहितीय जे आपल्याला माहित नाहीए ! आणि जे आपल्या कुटुंबाशी ,परिवाराशी संबंधित आहे . . ते माधवला शांतपणे म्हणाले ,

" माधव ,तुझा विश्वास बसणार नाही . पण बऱ्याच गोष्टी पुढे गेल्या आहेत . हाताबाहेर गेल्या आहेत . आता निस्तरल्या नाहीत तर आपलं ,आपल्या कुटुंबाचं अस्तित्वच धोक्यात येईल . तेव्हा तू यात न पडलेलंच बरं . आणि ही सांगतेय ते शब्दशः सत्य आहे ! "

" बाबा ,माझं असं काहीच म्हणणं नाही . माझा तुमच्यावर विश्वास आहे . मी तुम्हाला एकटं सोडणार नाही . तुम्ही सांगाल तेच आणि तसेच होईल . पण मी इथेच थांबेन ! "

वेळ घालवण्यात अर्थ नव्हता . केशवराव बघण्यापलीकडे काही करू शकत नव्हते .

" दुर्गे ,बोल ! कुणाशी बोलत होतीस ? "

" पंत , भैरव आला होता ! "

" काय ?"

" हो आणि सोबत त्याची बायको यशोदा आणि मुलगी पार्वती ! त्याने मला धमकी दिलीय की मी त्याला मदत करावी नाहीतर तो मला संपवेल !

मी पण त्याला खडसावलं . तेव्हा तो मदतीच्या मोबदल्यात आपल्या कुटुंबाला जीवनदान देईल म्हणून वचनबद्ध झाला . "

" पण तो कोण आपल्याला जीवनदान देणारा ?"

" पंत ,तुम्ही समजता तेवढ्या गोष्टी सरळ नाहीत . तुम्ही त्याची वास्तू पाडून त्यांच्या अस्तित्वावर घाला घातलात . म्हणून त्यांनी स्नेहल आणि स्नेहांश वर ताबा मिळवलाय ! "

"काय ?" माधव किंचाळलाच !

" काय म्हणालीस तू ?"

" हो माधवा ,सध्यातरी तुझ्या बायको आणि मुलावर यशोदा आणि पार्वती या दोन आत्म्यांनी ताबा मिळवलाय . आपल्याला सावध राहावं लागेल . नाहीतर दोघे हातातून जातील ! "

" पण ते आपल्या मागे का लागलेत ?"

" याला कारणीभूत तर केशव चं कुटुंब आहे . तुम्ही दोघांनी चूक केलीत ,त्यांना मदत करायला गेलात आणि स्वतःचं कुटुंब धोक्यात घातलं . त्यातच माझ्या बहिणीचा बळी गेला ! माझं ऐका ! अजून ही वेळ गेली नाही . या तिघांना घराबाहेर काढा .. त्यांचं ते बघतील काय ते ! "

" मावशी बरोबर बोलतायत . आमच्या साठी तुम्ही जीव धोक्यात घालू नका ! "

" नाही ,केशवा ,तिची काळजी रास्त आहे . पण तुम्हाला सोडून ही समस्या सुटणार नाही . संपणारी नाही . याच्या मुळाशी जावं लागेल ! " गंगाधर पंत म्हणाले .

" आणि याचं मूळ त्या जागेतच ,त्या तळघरात आहे . गुरुजी असच म्हणाले होते . आपल्याला तिथेच जावं लागेल . गुरुजी आणि लोहाराचा अंत तिथेच झाला असं भैरव काहीतरी म्हणत होता . ... दुर्गे ..... माझ्यावर विश्वास आहे ? .... " गंगाधर पंतांनी एकदम विचारलं .

" पंत ,हे काय विचारताय ? अहो तुमच्यावर नाही विश्वास ठेवायचा मग कुणावर ठेवायचा ? "

" नाही यासाठी विचारलं ,की आपल्याला त्या तळघरात जावं लागेल . आपल्या शक्ती वापरून भैरव ला नेस्तनाबूत करावं लागेल . "

" पंत ,तुमचं म्हणणं बरोबर आहे . पण तुमचे गुरुजी एवढे सहज संपणारे नाहीत ! "

“ म्हणजे ?" गंगाधर पंतांना हा सुखद धक्का होता .

" मला वाटतं भैरव आपल्यापासून काही लपवतोय . किंवा गुरुजी तरी ! "

" दुर्गे काय बोलतेस कळतंय का ? "

" पंत त्रागा करू नका . सुखरूप बाहेर पडायचं असेल तर सर्वात पहिले डोकं शांत ठेवावं लागेल . प्रत्येक शब्दाचा वेगळा अर्थ काढणं थांबवावं लागेल . आपला लढा अमानवी शक्तींशी आहे . नकारात्मक ऊर्जेशी आहे .

आपल्या मानवी क्षमतांचा वापर करून आपली सकारात्मक ऊर्जा वाढवावी लागेल . तरच आपला निभाव लागेल . नाहीतर त्यांच्या पुढे आपला निभाव लागणं शक्य नाही ! "

गंगाधर पंतांना ही असंच वाटत होतं पण नेमकं शब्दात मांडता येत नव्हतं जे दुर्गा बाईंनी मांडलं . आणि त्यांना खूप बरं वाटलं , या शक्यतेने की गुरुजी अजून जिवंत आहेत ! हा खूप मोठा मानसिक आधार होता !

" दुर्गे ,तू माझं खूप मोठं दडपण दूर केलं . देव करो आणि तुझ्या तोंडात साखर पडो . आणि गुरुजी सुखरूप असोत .

कारण त्यांना मीच तिथे घेऊन गेलो होतो . पण मला एक कळत नाही की भैरव ने किंवा त्याच्या कुटुंबाने काशीला का मारलं तिच्या शरीराचा ताबा घेऊन तिचा वापर का केला नाही ? "

" पंत ,अहो तो साधो सरळ बाइ ! तो यांचा कुणाचा भयानक अवतार पाहूनच घाबरली असेल ! अहो क्षणभर माझी ही भीतीने बोबडी वळाली होती .

सामान्य माणूस या कल्पनेने ही घाबरतो . स्नेहल ,स्नेहांश सोबत काय झालं आपल्याला माहित नाही . पण निदान ते सुखरूप आहेत , थोडा तरी वेळ आपल्या हातात आहे . तो वेळ घालवून उपयोग नाही . "

" तुम्ही जायचं म्हणत होतात ना ? मग कधी जायचं तिथे ? " " तुला काय वाटतं ?"

" पंत ,आपण सहजासहजी त्या भुयारात पोहोचू असं तुम्हाला वाटतं ? आणि जरी पोहोचलो तरी पुन्हा परत येऊ ? परत नाही आलो तरी हरकत नाही पण समस्या सुटलीच नाही तर मग यांचं काय ? माधव एकटा काय करेल ?"

" दुर्गे सध्यातरी आपल्या हातात एवढंच आहे की आपण एक क्षण ही वाया न घालवता जे शक्य आहे ते करावं . तसा ही माधव एकटा नाही . केशव आणि सीमा आहेत सोबत करायला . "

" पंत त्यांच्यावर जास्त विश्वास ठेऊ नका . त्यांनीच घात केलाय आपल्या कुटुंबाचा . "

" नाही दुर्गे ,त्यांनी फक्त आपले पणाने जे झालं ते सांगितलं . आणि वाडा पाडायचा निर्णय लोहार चा होता . त्याला इन्स्पेक्टर ने प्रवृत्त केलं . आणि तुला काय वाटतं ?

की यांनी आपल्याला सांगितलं नसतं तर भैरव आपल्या पर्यंत पोहोचला नसता ? त्याने फक्त निमित्त बनवलंय यांना ! हा विषय पुन्हा काढू नकोस ,काही उपयोग नाही त्याचा ! बरं ,पोरांनो ,सांभाळा !

एकमेकांसोबत राहा ! आम्ही परत येऊ की नाही सांगता येत नाही ! पण एकमेकांना दूषणं देऊ नका ! "

" बाबा ,अहो असं काय बोलताय ? हे सगळं करण्याची काय गरज आहे ? काही तरी चांगला मार्ग असेलच ना ? असं जीवावर उदार होऊन कसं चालेल ? "

गंगाधर पंत काही बोलले नाही . त्यांनी फक्त माधवच्या डोक्यावरून हात फिरवला . पाठ थोपटली .

" येतो आम्ही ! काळजी घे !

आणि सकाळी पाहुणे जातील तर जाऊ दे ! कुणाला थांबवू नकोस आणि काही विषय काढू नकोस ! जेवढी गर्दी कमी तेवढा धोका कमी राहील . येतो आम्ही ...."

TO BE CONTINUED…

➢➢➢➢➢➢➢➢

लेखक :-योगेश वसंत बोरसे

Publications

ही काल्पनिक कथा मनोरंजन या हेतूने निर्माण केली आहे.

All Rights Reserved at
Yogesh Borse & BGSM